शुक्रवार, ८ डिसेंबर २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - ११८
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) FRIDAY 8 DECEMBER. 2023 | adhunikkesari.com Adhunik Kesari | YEAR-03 • ISSUE-118 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-10 • PRICE-05

# तेलंगणाच्या मुख्यमंत्रीपदी रेवंत रेड्डी

## मल्लिकार्जुन खर्गे, सोनिया गांधी, राहुल गांधी, सिद्धरामय्या उपस्थित



आधुनिक केसरी न्यूज

**हैदराबाद : तेलंगणातील हैदराबाद येथील एलबी स्टेडियमवर आयोजित करण्यात आलेल्या शपथविधी कार्यक्रमात काँग्रेस नेते रेवंत रेड्डी यांनी पद आणि गोपनियतेची शपथ घेतली. तेलंगणाचे राज्यपाल टी सुंदरराजन यांनी काँग्रेस नेते रेवंत रेड्डी यांना मुख्यमंत्री पदाची शपथ दिली. तेलंगणाच्या नवनिर्वाचित मुख्यमंत्र्यांच्या शपथविधीसाठी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, सोनिया गांधी, राहुल गांधी आणि प्रियंका गांधी, कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या, उपमुख्यमंत्री डी शिवकुमार यांच्यासह अनेक काँग्रेस नेते उपस्थित होते.**

रेवंत रेड्डी हे तेलंगणा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आहेत. रेवंत रेड्डी तेलंगणाचे दुसरे मुख्यमंत्री असतील. 2013 मध्ये तेलंगणाच्या स्थापनेनंतर काँग्रेस पहिल्यांदाच सत्तेत आली आहे. आतापर्यंत केवळ चंद्रशेखर राव दोनदा मुख्यमंत्री झाले होते. मात्र, यावेळी त्याना हॅट्रिक करण्यात अपयश आले. रेवंत रेड्डींनी चंद्रशेखर रावांचे स्वप्न धुळीला मिळवले आणि काँग्रेसकडे सत्ता खेचून आणली.
56 वर्षीय रेवंत रेड्डी यांनी एलबी स्टेडियममध्ये मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. शपथविधी कार्यक्रमात सुमारे एक लाख लोक सहभागी झाले होते. शपथ घेण्यापूर्वी रेवंत रेड्डी सोनिया गांधींसोबत खुल्या जीपमधून स्टेडियमवर पोहोचले.
तेलंगणामध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने दणदणीत विजय मिळवला आहे. पक्षाने 119 पैकी 64 जागा जिंकत बहुमत मिळवले. तर बीआरएसला केवळ 39 जागांवरच विजय मिळवता आल्या. भाजपने तेलंगणात केवळ 8 जागाच जिंकल्या आहेत.
कर्नाटकानंतर तेलंगणा हे दक्षिणेतील दुसरे राज्य आहे, जिथे काँग्रेसने स्वतःचे सरकार स्थापन केले आहे. तामिळनाडूमध्ये काँग्रेस द्रमुकसोबत आघाडी सरकारमध्ये आहेत. तेलंगणातील विजयाचे श्रेय काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष रेवंत रेड्डी यांना जाते. सुरुवातीपासूनच ते मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीत आघाडीवर होते. अखेर मंगळवारी पक्षाने त्यांच्या नावाला अधिकृत मान्यता दिली आणि आज रेवंत रेड्डी यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली.
रेवंत रेड्डी यांचा जन्म 1969 मध्ये अविभाजित आंध्र प्रदेशातील महबूबनगर येथे झाला. रेड्डी यांनी विद्यार्थी राजकारणाची सुरुवात अभाविपपासून केली होती. नंतर त्यांनी चंद्राबाबू नायडू यांच्या तेलगू देसम पक्षात प्रवेश केला. 2009 मध्ये ते टीडीपीच्या तिकिटावर आंध्रमधील कोडंगलमधून आमदार म्हणून निवडून आले. 2014 मध्ये ते तेलंगणा विधानसभेत टीडीपीचे सभागृह नेते म्हणून निवडले गेले.
रेवंत रेड्डी यांनी 2017 मध्ये काँग्रेसमध्ये प्रवेश केला. मात्र, 2018 च्या विधानसभा निवडणुकीत त्यांचा पराभव झाला. तथापि, काँग्रेसने त्यांच्यावर विश्वास व्यक्त केला आणि 2019 च्या लोकसभा निवडणुकीत त्यांना मलकाजगिरीतून तिकीट दिले, ज्यामध्ये ते विजयी झाले. 2021 मध्ये काँग्रेसने त्यांना मोठी जबाबदारी दिली आणि प्रदेशाध्यक्ष केले.

### चर्चेतली बातमी

# मलिक यांना महायुतीत घेणे योग्य नाही

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** राज्याचे माजी मंत्री नवाब मलिक आज हिवाळी अधिवेशनानिमित्त विधानसभेच्या कामकाजात सहभागी झाले. यावेळी सभागृहाते ते नेमके कुठे बसणार यावरून बराच तर्क-वितर्क लढविण्यात येत होता. मात्र अखेर त्यांनी सत्ताधारी बाकावर बसण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर विधानपरिषदेत याचे पडसाद उमटले. तिथे विरोधी पक्षनेते आंबादास दानवे यांनी यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला होता. मात्र फडणवीस यांनी दानवे यांचा आरोप खोडून काढला. आता फडणवीस यांनी अजित पवार यांना एक पत्र लिहून या विषयावर सविस्तर भूमिका मांडली आहे. सत्ता येते आणि जाते. पण सत्तेपेक्षा देश महत्वाचा", असे कॅप्शन देऊनफडणवीस यांनी ट्विटर आणि फेसबुकवर हे पत्र पोस्ट केले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांना लिहिलेल्या पत्रात फडणवीस यांनी म्हटले, माजी मंत्री आणि विधानसभा सदस्य नवाब मलिक हे आज विधीमंडळ परिसरात येऊन कामकाजात सहभागी झाले होते. विधानसभा सदस्य म्हणून त्यांचा तो अधिकार सुद्धा आहे. त्यांच्याबाबत आमची वैयक्तिक शत्रूता अथवा आकस अजिबात नाही, हे मी प्रारंभीच स्पष्ट करतो. परंतू, ज्या पद्धतीचे आरोप त्यांच्यावर आहेत, ते पाहता, त्यांना महायुतीमध्ये घेणे योग्य ठरणार नाही, असे आमचे मत आहे. सत्ता येते आणि जाते. पण सत्तेपेक्षा देश महत्त्वाचा आहे. सध्या ते केवळ वैद्यकीय आधारावर जामीन मिळाल्याने बाहेर आहेत. त्यांच्यावरील आरोप सिद्ध न झाल्यास आपण त्यांचे जरूर स्वागत करावे. मात्र अशाप्रकारचे आरोप असताना त्यांना महायुतीचा भाग करणे, हे योग्य नाही, असे आमचे स्पष्ट मत आहे.

# मनोज जरांगेंचा छगन भुजबळांना इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** जिल्ह्याच्या उमरखेड येथील सभेतून मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा छगन भुजबळांवर हल्लाबोल केला आहे. एकदा मराठ्यांना आरक्षण मिळाले की छगन भुजबळांचा कार्यक्रमच करतो, असा अप्रत्यक्ष इशारा मनोज जरांगे यांनी दिला आहे. उमरखेड येथील सभेतून मराठा समाजाला उद्देशून केलेल्या भाषणात मनोज जरांगे म्हणाले, "विरोध करणाऱ्यांचा तुम्ही ताण घेऊ नका. त्यांना मी एकटाच खंबीर आहे. एकदा आरक्षण मिळू द्या, त्याचा (छगन भुजबळ) कार्यक्रमच वाजवतो. इतक्या उच्च दर्जाचा मंत्री, एक पुढारी साध्या साध्या गोरगरीब मराठ्यांच्या लेकरांना आरक्षण मिळते तर तो आडवा येतोय. याच्यासारखा कलंकित मंत्री या राज्यात दुसरा असूच शकत नाही. सध्या नागपूरमध्ये महाराष्ट्राच्या विधीमंडळाचे हिवाळी अधिवेशन सुरू आहे. या अधिवेशनात मराठा आरक्षणावर तोडगा निघण्याची शक्यता आहे, अशी सूचक वक्तव्यं सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांकडून करण्यात आली आहेत. त्यामुळे मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लागणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



सध्या दक्षिण भारतातील अनियमत झालेल्या वादळी पावसाचे गार वारे महाराष्ट्र राज्याला हे झोंबत असून बुधवारी आकस्मित पडलेल्या धुके आणि थंडीने पुरंदर तालुका गारठला असून रस्त्याने शेकोटी पेटवीत लोक उब घेताना दिसून येऊ लागलेत. छायाचित्र : विजयकुमार हरिश्चंद्रे

# चार शिक्षकांची नांदेडला प्रतिनियुक्ती; अधिकाऱ्यांचा कानाडोळा


## भोकर तालुक्यातील शिक्षणाचा खेळखंडोबा

आधुनिक केसरी न्यूज

भोकर : शिक्षण हे माणसाचा अलंकार म्हणून ओळख आहे. तोच दागीणा तालुक्यात डागाळला जात असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. आधीच शिक्षकाची कमतरता असुन चार शिक्षकाची प्रतिनियुक्ती नांदेड येथे करण्यात आली आहे.परिमामी शैक्षणिक गुणवत्ता ढासाळत असुन संबंधित अधिकारी याकडे जाणीवपूर्वक कानाडोळा करीत असल्याने पालकात तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. सर्वांसाठी मोफत शिक्षण, शिक्षणापासून कोणी वंचित राहू नये,यासाठी शासनाचे विविध स्तरावरून प्रयत्न आहेत, गाव, वाडी तांड्यावरील प्रत्येकाला शिक्षण मिळालेच पाहिजे हा शासनाचा उदात्त हेतू आहे. शासनाच्या ऊदेशाला तालुक्यात बगल देत असल्याचे समजते. केंद्रप्रमुख (आठ), सहशिक्षक(२९) ,विस्तार अधिकारी (चार) जागा रिक्त आहेत .तर (चार) प्राथमिक शिक्षकांना नांदेडला प्रतिनियुक्तीवर पाठविण्यात आले असल्याने तालुक्यातील प्राथमिक शिक्षणाची दैनियअवस्था झाली आहे. तालुक्यात जिल्हा परिषदेच्या (१२५) शाळा असून पहिली ते सातवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना शिक्षणाचे धडे दिले जातात ग्रामीण भागामध्ये काही शाळेतील



शिक्षणाचा दर्जा उंचावलेला आहे मात्र काही शाळांची अत्यंत वाईट परिस्थिती आहे. ब-याच विद्यार्थ्यांना अक्षराची ओळख झाली नसल्याचे दिसून येते आहे.जिल्हा परिषद शाळे मधील गुणवत्ता राहिलेली नसल्याने इंग्रजी शाळा कडे पालकांचा कल वाढला आहे. ग्रामीण भागामध्ये शिक्षणाची वाताहत होत असताना तालुक्यातील चार शिक्षकांना नांदेडला प्रतिनियुक्ती देण्यात आली आहे. यात प्रामुख्याने दिवशी,देवठाणा,सोमठाणा येथील शाळेतील शिक्षकाचा समावेश आहे.सदरील शिक्षकांना प्रतिनियुक्ती का देण्यात आली ?ज्या शाळेवर ते शिक्षक होते त्या शाळांच्या शिक्षणाच्या व्यवस्थेबद्दल काय ?याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी का विचार केला नाही ?तालुक्यातील शिक्षण विभागाने यासाठी काय प्रयत्न केले ?किती दिवसापासून प्रति नियुक्तीवर हे शिक्षक आहेत ?ते काय काम करतात ?याबाबत सखोल चौकशी व्हावी आणि ज्या शाळेवर सदर शिक्षकांची नेमणूक आहे त्या शाळेवर त्याना पाठवून देण्यात यावे, अशी मागणी पालक वर्गातून होत आहे.
तालुक्यातील शैक्षणिक प्रगती दिवसेंदिवस खुंटल्या जात आहे. शिक्षण विभागाने याकडे कमालीचं दुर्लक्ष केले आहे.अशा परिस्थितीत तालुक्यातील गटशिक्षणाधिकारी पद अद्याप भरले नाही.येथील शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांकडे अतिरिक्त पदभार देऊन मोकळे झाले आहे.त्यामुळे शिक्षकावर वचक राहिली नाही.तालुक्यातील शैक्षणिक प्रगती वाढवण्यासाठी प्रयत्न करणं गरजेचं झालं आहे.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

अभिव्यक्ती स्वातंत्र्य नाही का ? देश धार्मिक हुकूमशाहीकडे, फॅसिस्ट वादाकडे झुकतो आहे अशी विविध विधाने केली गेली. दाभोळकर, पानसरे किंवा गौरी लंकेश यांच्या हत्येचे समर्थन कोणीच करणार नाही आणि करू नये. कोणी वेगळी भूमिका मांडली तर त्यांची हत्या करणे हे कधीच समर्थनीय ठरू शकत नाही. ती निषेधार्हच गोष्ट आहे. विशेष म्हणजे सावरकरांबद्दल वरीलप्रमाणे विधाने करणाऱ्या व्यक्ती या जेष्ठ साहित्यिक किंवा सामाजिक कार्य करणाऱ्या होत्या. त्यांच्याकडून अशा प्रकारची विधाने ऐकणे हे आश्चर्यचकित करणारे आणि धक्कादायक वाटले. उथळ विधाने करणारी आणि सावरकरांच्या जीवनकार्याचा फारसा अभ्यास न करणारी एखादी व्यक्ती सावरकरांच्या विरोधात बोलते म्हणून तिचे म्हणणे खरे मानून सावरकरांचा त्याग, देशभक्ती या सगळ्याच गोष्टींवर बोळा फिरवायचा का याचा बोलणाऱ्यांनी विचार करायला हवा. महात्मा गांधींनी आपल्या ' माझे सत्याचे प्रयोग ' या आत्मचरित्रात आपण केलेल्या चुकांची कबुली दिली आहे म्हणून ते महान होत नाहीत किंवा सावरकरांनी स्वतःच्या चुकांबद्दल असे काही लिहिले नाही म्हणून ते लहान होत नाहीत. सावरकर,गांधी, नेहरू, सरदार पटेल, डॉ आंबेडकर, म. फुले यांच्यासारख्या व्यक्ती मुळातच महान आहेत. या सगळ्या महापुरुषांनी आपल्या जीवन कार्यातून काय संदेश दिला हे माझ्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली हल्ली कोणीही काहीही बोलावे असे झाले आहे. ज्यावेळी एखाद्या सार्वजनिक कार्यक्रमात किंवा समारंभात आपण भाषण करतो, तेव्हा लोकांपुढे कोणता आदर्श ठेवायचा हा खरंतर ज्याचा त्याचा प्रश्न आहे पण ज्यावेळी आपण महापुरुषांबद्दल बोलतो, त्यावेळी त्यांचे दोषदिग्दर्शन न करता त्यांच्या गुणांवर आपण लक्ष केंद्रित केले पाहिजे असे मला वाटते. गुणग्राहकता आपल्याजवळ असली पाहिजे.



## आनंदी पहाट

## वाचनाचा व्यासंग वाढवावा

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

पुस्तके वाचण्याचे अनेक शारीरिक आणि मानसिक फायदे होऊ शकतात. यामध्ये आपला मेंदू बळकट करणे, आपली सहानुभूती दाखवण्याची क्षमता वाढवणे, तणाव कमी करणे आणि आपला शब्दसंग्रह तयार करणे, यांचा समावेश आहे. वाचताना, आपल्याला दिलेल्या कथेशी संबंधित भिन्न
पात्रे लक्षात ठेवाव्या लागतात. जरी आपल्याला एकाच वेळी एखादे पुस्तक वाचण्यात मजा येत असली तरी, आपल्याला पुस्तक वाचण्यासाठी लागणारा संपूर्ण वेळ लक्षात ठेवावा लागतो. वाचन ही आपल्या मेंदूसाठी एक कसरत आहे, जी स्मरणशक्ती सुधारण्यास पूरक ठरते. आपल्याला हे माहीत आहेच, की बहुतेक लोकप्रिय टीव्ही शो, चित्रपट पुस्तकांवर आधारित आहेत. तर मग आपण वाचनात मग्न होऊन मनोरंजनाच्या मूळ स्वरूपाचा आनंद का घेऊ नये. वाचन एकाग्रतेशिवाय होऊ शकत नाही आणि कथा, विषय पूर्णपणे समजून घेण्यासाठी, आपण वाचत असलेल्या प्रत्येक पृष्ठावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. अशा जगात जिथे गॅझेट्स फक्त वेगवान होत आहेत आणि आपले लक्ष कमी करत आहेत, आपल्याला सतत एकाग्रता आणि लक्ष केंद्रित करण्याचा सराव करणे आवश्यक आहे. वाचन हे अशा काही क्रियाकलापांपैकी एक आहे, ज्यावर आपले अविभाज्य लक्ष असणे आवश्यक आहे. त्यामुळे आपली लक्ष केंद्रित करण्याची क्षमता सुधारणे शक्य होऊ शकते. नवीन शब्दांची ओळख करून देऊन आपला शब्दसंग्रह सुधारण्याची ताकद पुस्तकांमध्ये असते. आपण जितके जास्त वाचत राहू, तितका आपला शब्दसंग्रह वाढतो आणि आपल्या प्रभावीपणे संवाद साधण्याच्या क्षमतेमध्ये देखील परिवर्तन घडून येते. वाचनामुळे वेगवेगळ्या
लेखन शैली शिकण्यास मदत होऊन लेखन कौशल्य सुधारते. वाचन आपल्याला तणावमुक्त करण्यात मदत करत असल्याने, झोपण्यापूर्वी असे केल्याने मन शांत होऊन झोपेची गुणवत्ता सुधारण्यास मदत होते.



आधुनिक केसरी

### मौन सिध्द होते | ब्रह्मरूप ||

सत्कर्माचे ठायी | भयास न थारा ||
पापाचा निचरा | होत जातो ||१||
संचिताचा पाया | पुण्याचा संचय ||
निष्काम अजय | वर्म जाण ||२||
भुतदया भाव | जागता अंतरी ||
सुखी तो संसारी | सर्वकाळ ||३||
नको प्रतारणा | नको निंदा द्वेष ||
हरिनाम घोष | कर्मासंगे ||४||
संत संगतीने | कर्म शुद्ध होते ||
मौन सिध्द होते | ब्रह्मरूप ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण


आधुनिक केसरी

परस्त्री देखोनि दृष्टीं । अभिळाष उठे पोटीं ।
अकर्तव्यें हिंपुटी । पुन्हां होये ॥ १६ ॥
ऐसें पाप उदंड केलें । शुभाशुभ नाहीं उरलें ।
तेणें दोषें दुःख भरलें । अकस्मात आंगीं ॥ १७ ॥
व्याधी भरली सर्वांगीं । प्राणी जाला क्षयरोगी ।
केले दोष आपुले भोगी । सीघ्र काळें ॥ १८ ॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

धन काया मन वचन से, सन्त परम गुरु सेव ।
आरत दीन अधीन हो, अनुगामी गुरुदेव
।।०१।।(स्वर्वेद पंचम मण्डल पंचम
अध्याय) ०५/०५/०१

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
आर्त, दीन आणि अधीन बनून सद्गुरूंच्या आज्ञा-नियमात राहून धन, शरीर, मन तथा वाणीने त्या संत-शिरोमणी सद्गुरूंची सेवा केली पाहिजे.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअ‍ॅप करा ८५५४८८३१६६.

## रामदास स्वामी

आधुनिक केसरी




उद्धव अथवा आक्का हे मात्र न विचारता खोलीत ये-जा करत व काय हवे नको ते पाहत. निजले असले तर उठवून दूध देत. पण ते दूधही स्वामींनी मर्जी असली तर घ्यावे नाही तर अपेक्षा नाही म्हणून सांगावे. उद्धव एके दिवशी म्हणाले की व्याधिनिरसनार्थ अनुष्ठान बसवितो व उत्तम वैद्य आणवितो; त्यावर हसून समर्थ म्हणाले आतापर्यंत देहाची ममता टाकण्याचा उपदेश दुसऱ्यास केला त्याचे हे सार्थक की काय? प्रारब्धाने देहाचे जे व्हायचे जेथे व्हायचे ते होत राहील. तेव्हा आक्का म्हणाल्या 'आपली इच्छा नसेल तर राहिला औषधोपचार; पण आता थंडीचे दिवस आले येथे डोंगरावर तर फार थंडी असते. तेव्हा चार दिवस खाली चाफळला किंवा दुसऱ्या एखाद्या ठिकाणी चलावे. 'समर्थांनी उत्तर दिले -

## नामात असणे म्हणजेच शुद्धीवर असणे

आधुनिक केसरी

दारुड्यांच्या मेळाव्यात सारेच दारूच्या धुंदीत असतात. पण त्यांतल्या एखादा दारू न प्यालेला असला तर बाकीचे दारुडे त्याला ‘ हा शुद्धीवर नाही ’ असे म्हणत असतात. वास्तविक तोच एकटा शुद्धीवर असून बाकीचेच खरे गैरसावध असतात. त्याप्रमाणे, आपण सर्वजण विषयांत दंग असल्याकारणाने, जो नामात असतो त्याला आपण ‘ हा शुद्धीवर नाही ’ असे म्हणत असतो. वास्तविक पाहता, ‘ नामाशिवाय जगात दुसरे सत्य नाही ’ अशी ज्याची दृढ भावना असते तोच खरा शुद्धीवर असतो, आपण मात्र भ्रमात असतो. आपल्याला झालेला हा भ्रम नाहीसा करायला तीन उपाय आहेत. एक सद्विचार, दुसरा सत्संगती, आणि तिसरा नामस्मरण. भगवंताचा विचार हाच खरा सद्विचार. एखाद्या माणसाला म्हटले, की तुझे अवयव आणि रंग यांच्याशिवाय ये, तर त्याला येता येणार नाही, कारण तो जिथे आहे तिथे त्याचा रंग आणि अवयव असणारच; त्याचप्रमाणे नाम, संत आणि भगवंत हे एकमेकांना चिकटूनच आहेत, त्यामुळे जिथे नाम आहे तिथे सत्संगती आणि भगवंत



असतातच. वासरू घेऊन गेले म्हणजे जशी गाय पाठीमागून आपोआप येते, त्याप्रमाणे नाम घेतले की भगवंत त्यामागे येतोच. आजकाल इतकी यंत्रे निघाली आहेत, मग भगवंताच्या प्राप्तीसाठी संतांनी एखादे यंत्र शोधून काढले नाही का, असा प्रश्न एखाद्याच्या मनात येईल, तर त्याचे उत्तर सोपे आहे. असे यंत्र संतांनी केव्हाच शोधून काढले आहे. त्या यंत्राचे नाव आहे ‘ रामनाम. ’ हे यंत्र सर्वांना मिळू शकते, सर्वांना वापरता येते, शिवाय ते कधीच गंजत नाही.

भक्त, भगवंत आणि नाम हे तिन्ही एकरूपच आहेत. जिथे नाम आहे तिथे भक्त आहे, आणि तिथेच भगवंत आहे. म्हणून नाम सर्वांत श्रेष्ठ आहे. ते नाम अनन्य होऊन आपण घेऊ या. नाल्यातून, गटारातून पाणी वाहते, ते किती घाण असते ! पण ते नदीला मिळते आणि ती सागराला मिळते. सागर त्या सर्वांना सागररूप करून टाकतो. तसे मनुष्य कितीही पापी, दोषी, अपराधी असू द्या, त्याने नाम-नदीची कास धरली की तो रामसागररूप झालाच म्हणून समजा. भगवंताला विसरणे हे सर्वांत मोठे पाप आहे. नामाने भगवंताचे स्मरण होते म्हणून नामाने पाप नाहीसे होईल. अनाथ शब्द नाथावाचून नाही, आणि नाथाला अनाथावाचून नाथत्व नाही. राम सर्वांचा नाथ आहे. त्याच्या अखंड स्मरणात आपण राहू या. प्रपंच वनवासासारखा आहे. रामाच्या स्मरणात प्रपंचातली संकटे आणि दुःखे कस्पटाप्रमाणे वाटतील.

१५. तुम्ही नाम घेत गेलात तर तुम्हांला संत धुंडीत जाण्याची जरूरीच नाही. तेच तुम्हांला धुंडीत येतील.

## गुणरूप

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

जगात हेच शाश्वत सत्य आहे भगवंताच्या नामात जगण्याचे सार समजले. "याची देही याची डोळा", पहाण्याचे भाग्य मला ३ तारखेला रविवारी लाभले. निमित्त होते गीता धर्म मंडळाच्या शताब्दी महोत्सवाचे. गीता काय शिकवते? गीता ही श्री विष्णूचे स्वतः सांगितलेल्या महाभारताचे सारामृत आहे. कारण भगवान श्रीकृष्ण हे आदिविष्णु आहेत. गीता ही भगवंताच्या मुखांतून स्त्रवलेले अमृत आहे. सध्याच्या आधुनिक युगात एकच शास्त्र,एकच ईश्वर,एकच धर्म,एकच ज्ञानमार्ग असावा, ज्ञानमार्गातून भक्ति मार्गाचा प्रवास सोपा होतो म्हणून संपूर्ण विश्वाकरता एकच ईश्वर असावा. तो ईश्वर म्हणजेच भगवान श्रीकृष्णअशा या धर्मपरायण मंडळींनी पुण्यात गीताधर्म मंडळाची स्थापना लोकमान्यांच्या प्रेरणेने केली. २३ जुलै १९२४ हा तो सुवर्ण दिवस,व तोच दिवस **गीताजयंती*म्हणून साजरा केला जातो.



भारतीय नौदलाच्या कसोटीचा काळ पान ६


आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शुक्रवार, ८ डिसेंबर २०२३

adhunikkesari.com Adhunik Kesari



१८१ दिवस मुदत ठेवीवर मिळवा 11% व्याजदर

नियम व अटी लागू

टोल-फ्री : 18004197501 rajasthanimultistate.in

राजस्थानी मल्टीस्टेट कार्यक्षेत्र महाराष्ट्र-कर्नाटक

राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सो.लि., परळी वैजनाथ

बँकींग • आरोग्य • शिक्षण • रियल ईस्टेट • इन्शुरन्स

चंदुलाल बियाणी चेअरमन

कार्यरत शाखा :

मुख्य कार्यालय व शाखा : मोंढा मार्केट, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072178/88
पंचशिल नगर शाखा : विद्यानगर जलालपूर रोड, पंचशिल नगर, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072809
मुख्य शाखा विस्तारित कक्ष : ऊर्जा प्लाझा, गणेशपार रोड, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072181
पंचशिल नगर शाखा विस्तारित कक्ष-१ : दिगंबर कॉम्प्लेक्स, नेहरू चौक (तळ), परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072180
पंचशिल नगर शाखा विस्तारित कक्ष-२ उड्डान पुला जवळ, शिवाजी नगर, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072805
सिरसाळा शाखा : बड़े निवास, जुने बस स्टँड रोड, सिरसाळा, ता. परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072184
अंबाजोगाई शाखा: प्रशांत नगर, बस स्टॅण्डच्या मागे, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. 9130072183
विस्तारीत कक्ष अंबाजोगाई-१ : मोहन कॉम्प्लेक्स, मेनरोड, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. 9130072802
विस्तारीत कक्ष अंबाजोगाई-२ घाटनांदुर, मेनरोड, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. 9130072808
बीड शाखा : जिजामाता चौक, मोंढा रोड, ता. जि. बीड. 9130072221
सोनपेठ शाखा : स्नेह सदन, विटा रोड, सोनपेठ, ता. सोनपेठ, जि. परभणी. 9130072186
गंगाखेड शाखा : डॉक्टर लेन, एच.डी.एफ.सी. बँकेसमोर, गंगाखेड, जि. परभणी. 9130072807
विभागीय कार्यालय व महेश नगर शाखा : अपना बजार २०४ २०६, आकाशवाणी जवळ, औरंगाबाद 9130072176 / 77
राजा बजार शाखा : बालाजी मंदिर समोर, राजा बजार, शहागंज, मोंढा, ता. जि. औरंगाबाद. 9130072022
माळीवाडा विस्तारीत कक्ष : नाशिक रोड, माळीवाडा, ता. जि. औरंगाबाद. 9130072803

अंबड शाखा: जालना-बीड रोड, महावीर चौक, आंबड, जि. जालना. 9130072804
जालना शाखा : मेन बस स्टँड रोड, जालना, ता. जि. जालना. 9130072806
जालना विस्तारीत कक्ष-१ : जांगडे कॉम्प्लेक्स, जालना-अंबड रोड, ता. जि. जालना. 9130072226
नांदेड विस्तारीत कक्ष : पहिला मजला, गुरूकृपा मार्केट, महावीर चौक, ता. जि. नांदेड. 9130003070
उदगीर विस्तारीत कक्ष : पहिला मजला, लासूणे कॉम्प्लेक्स, देगलूर रोड, उदगीर, जि. लातूर. 9130072190
टोकवाडी विस्तारीत कक्ष: परळी-बीड रोड, टोकवाडी, ता. परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072224
दिंद्रुड विस्तारीत कक्ष : शेप कॉम्प्लेक्स, परळी-बीड रोड, दिंद्रुड, ता. माजलगाव, जि. बीड. 9130002070
लातूर विस्तारीत कक्ष : कव्हा रोड, शिवनेरी गेट जवळ, लातूर 9130002070
औराद विस्तारीत कक्ष : मेन रोड, कृष्णा ऑईल मिल समोर, औराद शहाजनी, ता. निलंगा, जि. लातूर. 9130003044
बीड विस्तारीत कक्ष : मोंढा मार्केट, संतोषी माता मंदिर समोर, बीड, ता.जि. बीड. 9130072221
उमरगा शाखा : शिवाजी महाविद्यालय जवळ, बालाजी नगर, मेन रोड, उमरगा, जि. उस्मानाबाद.
परभणी शाखा: कापसे भवन, कच्छी बजार, सरदार वल्लभभाई पटेल रोड, परभणी.
अहमदनगर शाखा: शॉप नं. ३ व ४ बेसमेंट, मोरया कॉर्नर, मोरया मंगल कार्यालय, पाईपलाईन रोड, अहमदनगर.
केज शाखा : वकीलवाडी, कानडी रोड, केज, ता. केज. जि. बीड.
माजलगाव शाखा : गाळा क्र.८, सिद्धेश्वर कॉम्प्लेक्स, गढी कॉर्नर, गढी रोड, माजलगाव, ता. माजलगाव, जि. बीड.

नियोजित शाखा : धर्माबाद, उमरखेड, नाशिक, पंढरपूर, रेणापूर, पुणे, अकोला

कॉर्पोरेट ऑफिस : २०५,२०६, बिल्डिंग नं. २, पहिला मजला, अपना बाजार, जालना रोड, औरंगाबाद . मो. 9130072176, 9130072177


# जनतेच्या प्रश्नावर सरकार गंभीर नाही : नाना पटोले

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले होते त्याची मदत अजून मिळालेली नाही आणि आता पुन्हा गारपीट व अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांना भरीव मदत मिळावी यासाठी काँग्रेस पक्षाने स्थगन प्रस्ताव दिला, पण सरकारने चर्चेपासून पळ काढला. केवळ भरपूर मदत दिली आहे असे म्हणून चर्चा टाळणे हा शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार आहे, असा हल्लाबोल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला.

विधिमंडळ परिसरात प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सरकारवर तोफ डागली, ते पुढे म्हणाले की, शेतकऱ्यांच्या प्रश्नावर भाजपा सरकार गंभीर असते तर विरोधी पक्षाच्या स्थगन प्रस्तावावार सभागृहात चर्चा केली असती पण हे सरकारच शेतकरी विरोधी असल्याने त्यांनी चर्चा करणे टाळले. देशात सर्वात जास्त शेतकरी आत्महत्या यवतमाळ जिल्ह्यात होत आहेत. विदर्भातील प्रश्नावर चर्चा करु म्हणणारे भाजपाचे



सरकारच विदर्भातील शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चर्चाच करत नाही. हे सरकार १४ कोटी जनतेशी खोटे बोलत आहे. शेतकऱ्यांना मदत करायची आहे की नाही ते सरकारने स्पष्ट केले पाहिजे. हिवाळी अधिवेशनाचा कालावधीही कमी आहे. जनतेच्या पैशाची उधळपट्टी करत पर्यटनासाठी हे लोक आहेत. जनतेच्या प्रश्नावर सरकार गंभीर नाही. धानाला एक हजार रुपये बोनस द्या

विदर्भातील शेतकरीही अनेक समस्यांना तोंड देत आहे. अजून खरेदी केंद्रे सुरु झाली नाहीत. शेतकऱ्याचे धान व्यापारी ४००-५०० रुपये कमी दराने खरेदी करत आहेत. भाजपा सरकार शेतकऱ्यांच्या धानाला भावच मिळू देत नाही. धानाला अजून बोनसही जाहीर केलेला नाही. सरकारने धानाला एक हजार रुपये बोनस दिला पाहिजे अशी मागणीही पटोले यांनी केली आहे.

विरोधकांना घाबरवण्यासाठी एसआयटी

प्रत्येक अधिवेशनाच्या काळात शिवसेना आमदार आदित्य ठाकरेंच्या चौकशीचा प्रश्न उपस्थित केला जातो. आताही त्यांची एसआयटी चौकशी करु, असा मुद्दा पुढे आणला आहे. सरकारला प्रश्न विचारले जाऊ नये यासाठी अशा पद्धतीने सरकार विरोधी पक्षांच्या आमदारांना घाबरवण्याचे काम करत आहे. पण विरोधी पक्ष सरकारच्या अशा धमक्यांना घाबरत नाही, सरकारला जाब विचारण्याचे काम सुरुच राहील, असे पटोले म्हणाले.

# सावळदबारा येथील शिवाजी विद्यालयात महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील जय कालिका देवी शिक्षण संस्था संचलित छत्रपती शिवाजी माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय येथे महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला याप्रसंगी संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष भाऊराव लक्ष्मणराव कोलते व सजीव श्रीमती रत्नाबाई नारायण कोलते व सर्व संचालक मंडळ उपस्थित होते. याप्रसंगी बोधिसत्व, ज्ञानाचा महासागर भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना आदरांजली वाहिली त्यांनतर महाविद्यालयाचे प्राचार्य व मुख्याध्यापक नारायण रायभान कोलते यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन गाथेवर प्रकाश टाकला. संघर्षातून व गरिबीतूनच माणसाला आयुष्याचे व शिक्षणाची प्रचिती होते याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आपल्या आयुष्यामध्ये केवळ गरिबी व दारिद्र्य या गोष्टीवर रडत बसण्यापेक्षा स्वतःच्या मेहनतीवर व जिद्दीवर क्षणाच्या माध्यमातून लढायचं हे बाळकडू डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला पाजले अस्पृश्यता निर्मूलन शिका संघटित व्हा संघर्ष करा छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य डोक्यात ठेवून मी भारताची राज्यघटना तयार केली असे ठामपणे सांगणारे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्यासाठी काय केले हे शब्दात सांगता येणार



नाही संकटांना आयुष्यात घाबरायचं नसतं ज्ञानी माणसाच्या आयुष्यातच येतात व त्या संकटावर मात करून आपली प्रगती साधायची असते भारताला दिला. तुम्ही आयुष्यात चांगले कर्म करा, भविष्यात मोठे व्हाल तरी या समाजाकडून तुम्हाला त्रास होणारच कारण त्यांना तुमची प्रगती सहन होत नाही कारण त्यांना प्रती मागील संघर्ष दिसत नाही आपल्या वेळी आपल्या पुस्तकांच्या व आपल्या वाणीच्या माध्यमातून त्यांनी जगाला अनमोल संदेश दिला अशाप्रकारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले यावेळेस शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर बंधू उपस्थित होते विकास पाटील, विजयसिंग राजपूत, संजय जोशी, मुकुंद व्हहारे, सुदाम राठोड, भास्कर खमाट, भास्कर ससाणे, भूषण देसले, पोपटराव सोनवणे, पंजाबराव शेळके, गणेश मोहने, दीपक शिसोदे, योगेश शेळके, राहुल बडक, योगेश थोटे,अजाबराव चव्हाण,श्याम जाधव, बाबासाहेब कोलते,व सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# आंबेडकरांच्या धोरणाचा अभ्यास गरजेचा : सिरसाठ

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर याचां देशातील अर्थ तज्ञानां बाबासाहेब च्या अर्थ निति चा अभ्यास व कृषी धोरणाचा अभ्यास आजही गरजेचा असुन त्याचां अभ्यास केल्या शिवाय पुढे जाता च येणार नाही, असे प्रतिपादन वंचित बहुजन आघाडी पु. तालुका अध्यक्ष अनिल भाऊ सिरसाट यांनी अभिवादन सभेत केले.कन्नड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथे अभिवादन सभेत अनिल सिरसाट यानीं अभिवादन पर भाषण केले. यावेळी बौद्ध महासभेचे तालुका अध्यक्ष अरविंद कांबळे, सचिव रमेश धनेधर, डॉ. नितिन सरोदे, अशोक महाले, कडुबा पवार, आदिंनी आपली मनोगत व्यक्त केले.

अभिवादन सभेचे सुत्र संचालन वंचित बहुजन आघाडी चे महासचिव विनोद कदम यानीं तर संघटक गणेश मोरे यानीं आभार मानले. यावेळी युवराज बागुल, सिध्दार्थ निकाळजे, योगेश अंभोरे, अमोल साळवे, अक्षय महाले, राजु धिवर, मुकेश थोरात, अविनाश राठोड, विकास राठोड, भास्कर बोर्डे, प्रविण धिवर, योगेश साळवे, दिनेश नरवडे, भास्कर देवरे, पांडुरंग लोखंडे, नितिन बोर्डे, सुखदेव बोर्डे, सागर मोरे, राहुल सातदिवे, पप्पू सातदिवे यांची उपस्थिती होती.

# भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** दि. ६ डिसेंबर रोजी स्थानिक बौद्ध विहार येथे आज लोणार शहर काँग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष समद शेख अहमद, व युवक काँग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष विकास मोरे यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. महामानव भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला हार अर्पण करून अभिवादन करून महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. यावेळी विकास मोरे यांनी बाबासाहेबांच्या जिवनावर प्रकाश टाकत त्यांनी दिलेल्या संविधान आणि त्यांच्या मानवतेच्या विचारांची जोड यामुळे देशाची एकता, बंधूता, एकात्मता या तत्वांना बळ मिळाले असे ते म्हणाले. यावेळी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते प्रकाश भाऊ धुमाळ, उपनगराध्यक्ष बादशाह खान, युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष अनिकेत मापारी, अल्पसंख्यांक सेल तालुकाध्यक्ष तौफिक कुरेशी नगरसेवक संतोष मापारी, ओबीसी सेल शहराध्यक्ष अंबादास इंगळे, मनिष पाटोळे,गोपीचंद मोरे, रघुनाथ मोरे,गंगाधर साळवे, आकाश मोरे, प्रकाश मोरे, विलास अंभोरे, बबन अंभोरे, गोरखनाथ अंभोरे काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# मोदी यांचे आवाहन

आधुनिक केसरी

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत पाच राज्यांपैकी राजस्थान, मध्य प्रदेश आणि छत्तीसगडमध्ये भाजपाने विजय मिळवला. हा आपला सांघिक विजय आहे आणि आगामी निवडणुकीत पक्षाच्या कार्यकर्त्यांनी नवी आव्हाने स्वीकारण्यासाठी तयार रहावे, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज भाजपाच्या संसदीय सदस्यांच्या बैठकीत केले असल्याचे द इंडियन एक्सप्रेसने दिलेल्या बातमीत म्हटले आहे. संसदेचे हिवाळी अधिवेशन सध्या सुरू असून त्यानिमित्ताने नेहमीप्रमाणे भाजपाच्या खासदारांची बैठक सपन्न झाली. या बैठकीला पंतप्रधान मोदी येताच, सर्व खासदारांनी उभे राहून घोषणाबाजी करत, टाळ्या वाजवत त्यांचे स्वागत केले. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांनी पंतप्रधान मोदींचा सत्कार केला. तीन राज्यातील विधानसभा निवडणुकीमध्ये विजय मिळविल्यानंतर ही पहिलीच संसदीय सदस्यांची बैठक आहे. यावेळी भाषणात पंतप्रधान मोदी म्हणाले की, तीन राज्यात मिळालेल्या विजयामुळे हे निश्चित झाले की, आपल्या कामाच्या आधारावर आपण पुन्हा सत्ता मिळवू शकतो. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पंतप्रधान मोदी भाषणात म्हणाले की, सलग दोनदा सत्ता मिळविण्यात भाजपाचे प्रमाण इतर पक्षांच्या तुलनेत ५७ टक्के एवढा आहे. काँग्रेसचे दुसऱ्यांदा सत्ता मिळविण्याचे प्रमाण २० टक्क्यांच्याही खाली आहे. तर प्रादेशिक पक्षांचा दुसऱ्यांदा सत्ता मिळवण्याचे प्रमाण ४९ टक्के एवढे आहे. भाजपाचे तिसऱ्यांदा सत्ता मिळविण्याचे प्रमाण ५९ टक्के आहे, तर काँग्रेसने हल्लीच्या काळात कोणत्याही राज्यात एकदाही तिसऱ्यांदा सत्ता स्थापन केलेली नाही. केंद्र सरकारच्या योजना आणि त्याच्या लाभार्थ्यांचा प्रचार करण्यासाठी केंद्र सरकारच्या वतीने विकसित भारत संकल्प यात्रा सुरू करण्यात आलेली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व खासदारांना या यात्रेत सक्रिय सहभाग नोंदविण्याची सूचना केली. झारखंडमधून १५ नोव्हेंबर रोजी पंतप्रधान मोदी यांनी ही यात्रा सुरू केली. २५ जानेवारी २०२४ पर्यंत सदर यात्रा चालणार आहे. पंतप्रधान मोदी यांनी सर्व खासदारांना 'मोदीजी' न बोलण्याचे आवाहन केले आहे. ते म्हणाले, लोक मला मोदी या नावाने ओळखतात. त्यामुळे खासदारांनी मला मोदीजी किंवा आदरणीय मोदीजी म्हणून संबोधित करू नये. मी आजही पक्षाचा एक छोटा कार्यकर्ता आहे. मी जनतेच्याच कुटुंबाचा एक भाग आहे, असे मी समजतो. लोकांना मोदी म्हणून मी जवळचा वाटतो, त्यामुळे माझ्या नावापुढे श्री किंवा आदरणीय असे काही लावू नका.

# आलो म्हणे तुका । संतु न्याव्या विष्णू लोका ।।

आधुनिक केसरी



पंकज वसंत पाटील
मो. 9850430579

**महाराष्ट्रातील परंपरेत धर्मनीतीच्या विचारांस अग्रस्थान आहे. वेदांत, कर्मयोग, भक्तियोग समाजात रुजविण्याचे काम ह्या विचारांनी होते, आत्मोन्नती साधल्या जाऊन समजोन्नती होते. आपणात असलेल्या सर्व चांगल्या शक्ती लोकांच्या हिताकरिता खर्च करत राष्ट्राची अध्यात्मिक उन्नती करण्याचे काम संत महात्मे करत असतात. ह्या परंपरेचे आदर्श म्हणजे संत तुकाराम महाराज होय. देहभान विसरून किर्तनरंगात रंगलेल्या तुकाराम महाराजांच्या तोंडातून बाहेर पडलेल्या अंतर्बाह्य पवित्र असलेल्या अभंगावाणीतील अमृतसाठ्याचा गोडवा, पवित्रता यांच्या ज्या महान शिष्यामुळे आपल्याला अनुभवता येत आहे ते महान संत म्हणजेच संताजी महाराज जगनाडे.**

तुकोबारायांच्या सानिध्यामुळे भाग्यवान जाहलेल्या संताजी महाराजांबद्दल त्यांचे वंशज गोपाळबाबा म्हणतात


**संताजी तेली बहु प्रेमळ ।**
**अभंग लिहीत बसे जवळ ।**
**धन्य त्याचे सबळ ।**
**संग सर्वकाळ तुक्याचा ।।**

८ डिसेंबर १६२४ रोजी पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील सदुंबरे येथील आजोळी संताजींचा जन्म झाला. त्यांचे वडील विठोबा जगनाडे व आई माथाबाई हे विठ्ठलभक्त असल्याने संताजींवर लहानपणापासूनच धार्मिक संस्कार झाले.

तेल घाण्यावर तेल काढून विक्री करण्याचा पारंपारिक व्यवसाय असलेले जगनाडे कुटुंब सात्विक असल्याने धार्मिक-अध्यात्मिक कार्यासोबतच गरजवंतांना होईल तेवढी मदत करण्याकडे त्यांचा कल होता. पारंपरिक व्यवसायात निपुण करण्यासाठी लेखन, वाचन, अंकगणित यांचे व्यावहारिक शिक्षण संताजींना घरच्या घरी मिळाले.

त्या काळी असलेल्या बालविवाहाच्या प्रथेमुळे संताजी महाराजांचा विवाह वयाच्या १२ व्या वर्षीच यमुनाबाईशी विवाह झाला. तल्लख स्मरणशक्तीची देणगी लाभलेले संताजी महाराज घाण्यावर तेल गाळण्याबरोबरच ईश्वरभक्तीत लीन होत असत. घरातील धार्मिक वातावरणामुळे संताजींना भजन कीर्तनाची आवड जडली होती. त्या दरम्यान तुकाराम महाराजांनी कीर्तनांतून तत्कालीन अनिष्ठ रूढी, परंपरा व अंधश्रद्धेवर फार कोरडे ओढत समाजात विज्ञानवादी दृष्टिकोन रुजविण्याचा वसा घेतला होता. संत तुकाराम महाराजांची ख्याती संपूर्ण महाराष्ट्रात पसरली होती. असेच एकदा तुकाराम महाराज संताजींच्या गावी कीर्तनाला आले असता त्यांची रसाळ वाणी व अमोघ ज्ञानाने भारावून जाऊन संताजींनी तुकोबांच्या चरणी नतमस्तक होऊन त्यांना बोध देण्याची विनंती केली. तुकोबांनी त्यांना संसारात राहून भक्ती मार्गाची दिक्षा दिली. तेव्हापासून संताजी जगनाडे महाराज (संतू तेली ) संत तुकारामाच्या टाळकऱ्यांमध्ये सामील झाले. तुकोबा किर्तनास उभे मागे उभे राहणाऱ्या टाळकऱ्यांमधील निळोबाराय, रामेश्वरभट, गंगाधर मवाळ, संताजी जगनाडे, महादाजीपंत कुळकर्णी, शिवबा कासार, अंबाजीपंत, कोंडोपंत लोहकरे, मल्हारपंत कुळकर्णी, मालजी लाडे, गवरशेट वाणी, कान्होबा, नावाजी माळी, कोंडपाटील हे चौदा आसामी तुकारामांच्या विशेष प्रेमातले होते. तुकाराम महाराजांना हे सर्वजण गुरू मानत असत.

तुकाराम महाराजांच्या जथ्थामध्ये असलेल्या टाळकऱ्यांमधील धृपद आळवणारी तसेच सर्वात लहान असलेली संताजी आणि गंगाजी ही जोडगोळी एकपाठी होतीच, त्यातही संताजीचे हस्ताक्षर सर्वोत्तम. त्यामुळे कीर्तन संपल्या संपल्या संताजी तुकारामांचे नवे अभंग आपल्या वहीमध्ये नोंदवून ठेवत. या वह्या प्राणपणाने जपत असत. तुकारामांच्या अंतकाळापर्यंत संताजींनी तुकोबांची संगत सोडली नाही. तुकाराम महाराज पंढरीची वारी नित्यनियमाने करीत त्यांच्याबरोबर असलेल्या अनेक शिष्यमंडळीत विशेष आवडीचे हे चौदा टाळकरी शिष्य असत. तुकारामांच्या तोंडून निघालेले अभंग प्रेमाने लिहून ठेवण्याचे काम संताजी जगनाडे तेली हेच करीत असत. तुकाराम महाराजांच्या अभंगांची अस्सल संहिता संताजींच्या लिखाणात दिसून येते. तुकारामांच्या माथी धर्मद्रोहाच्या



पापाचा शिक्का मारून वाघोलीच्या दिवाणाने तुकारामांना सर्व लिखित वाङ्मय इंद्रायणीत बुडवण्याचा आदेश दिला. तुकाराम आपले सगळे कवित्व इंद्रायणीला अर्पण करून आमरण उपोषणाला बसले. संताजी व गंगाजींनी तुकारामांचा बहुतेक ठेवा आपल्याजवळ तसा जतन करून ठेवला होताच, पण तुकारामांचे आणखीही काही साहित्य लोकामुखी होते. त्याचा शोध घेत दोघे सलग तेरा दिवस मावळ प्रांती रानोमाळ घराघरातून भटकले. जात्यावरील बायकांची गाणी, शेती करतानाची शेतकऱ्यांची गाणी, काही लोकांकडे असलेल्या नोंदी अशा सगळ्या गोष्टी त्यांनी जमा केल्या आणि आपल्याला माहीत नसलेला आणखी तुकारामही अक्षरबद्ध केला. संत तुकारामांची गाथा संताजीच्या अथक परिश्रमांमुळेच जिवंत राहू शकली, असा स्पष्ट निर्वाळा महिपतीबुवापासून तर महारा सारस्वतकार वि.ल.भावे यांच्यापर्यंत सर्वजण निखालसपणे देतात.

तुकाराम महाराजांच्या सानिध्यात संताजी सुद्धा अभंग लिहू लागले. त्यांचे अभंग घाण्याचे अभंग म्हणून प्रसिद्ध आहेत.

**मजशी ते ब्रह्मज्ञान काही नाही ।**
**आपल्या कृपेने होईल सर्वथाही ।।**
**होईल मज आणि माझीया कुळांशी**
**पांडुरंग मुळाशी सर्व आहे ।।**
**संतू म्हणे ब्रम्ह ब्रह्मा सर्व जाणे ।**
**आपुले ते मन सुधारले ।।**

तेलाच्या घाण्याच्या माध्यमातून संताजींनी जीवनाचा नेमका अर्थ उलगडून सांगितला आहे प्रपंच, संसार आणि समाज याचा उत्तम समन्वय साधत संताजींनी कर्मकांडाचा कडाडून विरोध करत लोकांना अध्यात्म व विज्ञान समजावले. त्यांनी लिहलेल्या 'शंकरदीपिका' आणि 'तैलसिंधु' काव्यग्रंथांचा उल्लेख बऱ्याच ठिकाणी आढळतो. संताजींच्या व्यवसायातील अनेक रूपकं, उपमा, अलंकार व चित्रण त्यांच्या अभंगांतून झळकते. मनरुपी वाऱ्याचा बैल जोडून आपल्या शरीराला त्रिगुण तिळाचे घुसळण करण्यासाठी भाव आणि भक्तीची लाट करून आपल्या विचार विवेकांवर शांतीची शिळा ठेवायला हवी असे संताजी सांगतात.

**आमुचा तो घाणा त्रिगुण तिळाचा ।**
**नंदी जोडियला मन पवनाचा ।।**
**भक्ति हो भावाची लाट टाकियली ।**
**शांती शिळा ठेवीली विवेकावरी ।।**
**सुबुध्दीची वढ लावोनी विवेकांस ।**
**प्रपंच जोखड खांदी घेतीयले ।।**
**फेरे फिरो दिले जन्मवरी ।**
**तेल काढियले चैतन्य ते ।।**
**संतु म्हणे मी हे तेल काढियले ।**
**म्हणुनी नांव दिल संतु तेली ।।**

संताजी महाराज जगनाडे १६९९ मध्ये मार्गशीर्ष वद्य त्रयोदशीला अल्प आजारानंतर वयाच्या ७६ व्या वर्षी पांडुरंगचरणी रुजू झाले. शेवटच्या क्षणी माती टाकण्यास येणार असे वचन संत तुकारामांनी संताजीना दिले होते, परंतु तुकाराम महाराज संताजींच्या अगोदरच वैकुंठाला गेले होते.

**चारिता गोधन । माझे गुंतले वचन ।।**
**आम्हा येणे झाले । एका तेलीया कारणे ।।**
**तीन मुष्ठी मृतितका देख । तेव्हा लोपविले मुख ।।**
**आलो म्हणे तुका । संतु न्याव्या विष्णू लोका ।।**

असे सांगतात की, संताजी वारले तेव्हा अंत्यसंस्काराच्या वेळी कितीही प्रयत्न केले तरी संताजींचे पूर्ण शरीर गाडले जात नव्हते, त्यांचा चेहरा वरच राहत होता. तेव्हा वैकुंठाहून संत तुकाराम महाराज आपले वचन पूर्ण करण्यासाठी आले व त्यांनी तीन मुठी माती टाकल्यानंतर संताजींचा पूर्ण देह झाकला गेला अशी आख्यायिका सांगितली जाते.

संताजी जगनाडे हे तुकारामांच्या जीवलगांपैकी असल्याने त्यांच्या हातचे अभंग म्हणजे तुकोबांच्या मुखातून ते जसे स्त्रवले तसेच उतरविलेले आहेत. तुकोबांच्या तोंडची आणि संताजींच्या हातची भाषा शिवकालीन लौकिक मराठीचा अस्सल नमुना आहे. देहभान विसरून किर्तनरंगात रंगलेल्या तुकाराम महाराजांच्या तोंडातून बाहेर पडलेल्या अंतर्बाह्य पवित्र असलेल्या अभंगावाणीतील अमृतसाठ्याचा गोडवा, पवित्रता संतांजीमुळे आपल्याला अनुभवता येत आहे. शरीररूपी त्रिगुण तिळाच्या घाण्यास मनरुपी नंदी जोडून त्यावर भावभक्तीसह विचार-विवेकावर शांतिरूपी शिळा ठेवण्यास शिकविणाऱ्या संत शिरोमणी श्रीसंताजी जगनाडे महाराजांना कोटी कोटी प्रणाम !

# निसर्गाचा बदलता पॅटर्न शेतकऱ्यांनी स्वीकारायचा कसा



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**लाखोंचा खर्च करून मुद्दल सुद्धा परत येत नसेल तर शेती कसायची कशी आणि नैसर्गिक आपत्ती आली तर मुद्दल देखील परत येत नाही.प्रचंड मोठ्या प्रमाणात खर्च करून पाहिलेलं स्वप्न क्षणात गारपीट आणि अतिवृष्टी यामुळे चकणाचुर होत असेल तर पुन्हा उभा कसं राहायचं गारांचा पाऊस आणि अति वृष्टी हि शेतकऱ्यांनच्या स्वप्नांवर बेतत आहे . मागिल अनेक वर्षांपासून हे असंच चालू आहे मग शेती कसायची कशी हाच भविष्यातील शेती समोरील सगळ्यात मोठा प्रश्न असुन यामधून मार्ग कसा निघणार शेतकऱ्यांनी हा निसर्गाचा नवा प्रयोग कसा स्वीकारायचा आणि या मधून मार्ग काढुन जगायचं कसं हा मोठा प्रश्न भविष्यातील शेती समोर असणार आहे.**

मानवी हास्तक्षेप आणि वाढत औद्योगिकीकरण त्याच बरोबर प्रचंड वृक्षतोड यामुळे दिवसेंदिवस वातावरण हवामान बदलतं आहे त्याचा थेट परिणाम होऊन निसर्ग चक्र संतुलन बिघडलं आहे. कधी कोणता ऋतु चालू आहे हे देखील काही समजायला तयार नाही.हा निसर्गाचा नवा प्रयोग शेतकऱ्यांन साठी तर घातक आहेच पण त्याच बरोबर मानवी आरोग्यावर देखिल याचा विपरीत परिणाम होत आहे. मग अशा वेळी हा नवीन बदलता पॅटर्न शेतकऱ्यांनी कसा स्वीकारयाचा हिच खूप मोठी गंभीर समस्या देशातील शेतकऱ्यां समोर उभा आहे या मधून मार्ग कसा आणि कधी निघाणार हे गणित नेमकं कधी सुटणार यावर भविष्यातील शेती आणि शेतकरी यांचं जीवनमान अंवलबुन आहे.पावसाळा आरंभ झाला तर मोजक्या स्वरुपात पाऊस पडतो कस तरी पिकांची पेरणी केली तर पाऊस दडी मारतो आणि त्यामधून कसं बसं पिक पदरात पडायच्या वेळी प्रचंड मोठ्या प्रमाणात पाऊस चालू होतो. मग पावसाळ्यात निघाणारी पिक सुरवातीला कमी पाऊस आणि शेवटी जास्त प्रमाणात पाऊस या तडाख्यात सापडतात आणि हिवाळ्यात येणारी पिक अवकाळी व गारपिटीमुळे तडाख्यात सापडतात मगिल काही वर्षा पासून निसर्गाच्या अवकृपेमुळे पाऊस आणि गारपिट याचा कधी आरंभ होईल याचा नेम राहिला नाही हिवाळ्यात उन्हाळ्यात पाऊस पाडु लागला आहे.पाऊस पावसाळ्यात दडी मारू लागल्यामुळे पिक कशी घ्यायची आणि त्यापेक्षाही ते पदरात कसं पडेल हा खुप मोठा आणि गहन प्रश्न शेतकऱ्यां समोर उभा ठाकला आहे. हा निसर्गाचा रूद्र अवतार हा नवीन प्रयोग जरी असला तरी हा बदल स्वीकारणं खुपचं कठिण आहे. शेती कशी करायची पिक पदरात पडणार तेव्हाच पाऊस किंवा गारपिटी होत असेल तर मग उत्पादन खर्च कसा निघणार आणि त्या मधून जगायचं कसं व पुढील नियोजन कसं करायचं हि सगळी विवंचना खुप कठिण आहे. आजही बहुसंख्य लोकांच जीवन शेतीवर अवलंबून आहे पण शेती हि निसर्गाच्या लहरी पणामुळे तोट्यात जात आहे. बगायती शेतातील पीक सुद्धा पदरात पडायच्या वेळेला गारपिट व अतिवृष्टी मुळे क्षति ग्रस्त होऊन प्रचंड नुकसान होत आहे.पिकांच संरक्षण कसं करायचं हि खुप मोठी बाब शेतकऱ्यांना समोर आहे.पिक घेत असताना पिक लागवड ते उत्पादन होई पर्यंत निसर्गाने साथ दिली तर सगळं काही व्यवस्थित घडत पण ऐन वेळी शेवटच्या क्षणी पावसाने दगाफटका केला तर त्याचा परिणाम पिकांवर होऊन प्रचंड नुकसान होत आणि हिच परस्थिती मागिल काही वर्षा पासून दर वर्षी समोर येत आहे मग यामधून मार्ग कसा काढायचा आणि निसर्गाचा हा नवीन प्रयोग शेतकऱ्यांनी कसा सवीकारयाचा हा विद्यमान कालखंडातील सगळ्यात मोठा प्रश्न आहे.आपल तंत्रज्ञान एवढं प्रगत आहे दिवसेंदिवस नवनवीन शोध लागत आहेत हे जरी कौतुकास्पद असल तरी देखील शेती संदर्भात शाश्वत पिक मिळेल असं आजुन तरी संशोधन समोर आलं नाही निसर्गाच्या चक्रात शेतीच नुकसान होणार नाही अशी शाश्वती देणार काही तरी समोर येण गरजेचं आहे. निर्विघ्न पिक पदरात पडेल यासाठी संशोधन होण्याची गरज सध्या निर्माण झाली आहे आणि असं झालं तरच भविष्यात शेतीला सोन्याचे दिवस येतील अन्यथा शेतीच्या फंदयत कोणीही पडणार नाही. शेती आणि शेतकरी यांना सोन्याचे दिवस येण्यासाठी युद्ध पातळीवर प्रयत्न होऊन नैसर्गिक आपत्तीवर मात करेल असं तंत्रज्ञान अथवा नैसर्गिक आपती बाधा निर्माण करणार नाही अशी पिकं पद्धती अस्तित्वात आली पाहिजे जेणेकरून नैसर्गिक अडचणींवर मात करून पिक पदरात पडलं पाहिजे. तर आणि तरच शेती व शेतीपूरक व्यवसाय टिकतील. कारण शेती हाच अर्थव्यवस्थेचा कणा आहे आणि हा कणा मजबूत होण्यासाठी हा नवीन प्रयोग शेतकऱ्यांनी कसा स्वीकारयाचा यावर व्यापक संशोधन होऊन होण गरजेच आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# औपचारिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर लक्षात राहते ते खरे शिक्षण: स.पो.नी. देविदास वाघमोडे

आधुनिक केसरी न्यूज



**पिशोर :** आपल्या जीवनात वेळेचे महत्व अनन्य साधारण आहे. मित्रांसाठी आणि इतरांसाठी विनाकारण वेळ वाया न घालवता तो वेळ आपल्या शिक्षणासाठी उपयोगात घ्यायला हवा. विद्यार्थी दशा ही अत्यंत महत्त्वाची दशा आहे. जो याकडे दुर्लक्ष करेल त्याच्या जीवनाची दशा होईल. शिक्षणातून व्यक्ती, कुटुंब, समाज आणि राष्ट्र सुजलाम सुफलाम होते. मात्र औपचारिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर जे लक्षात राहते ते खरे शिक्षण होय, असे प्रतिपादन पिशोर पोलीस ठाण्याचे प्रभारी, सहाय्यक पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे यांनी केले.

येथील महात्मा ज्योतिबा फुले माध्यमिक व कला विज्ञान उच्च माध्यमिक विद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व क्रांतिसिंह नाना पाटील स्मृती सोहळ्या निमित्त आयोजित महामानवांना मानवंदना, गुणवंतांचा सत्कार आणि मार्गदर्शन समारंभात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी घाटमाथा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष क.रा. नवले गुरुजी हे होते. औपचारिक शैक्षणिक जीवनाचा पुरेपूर उपयोग करून दर्जेदार शिक्षण घेऊन स्वतःला, कुटुंबाला, समाजाला आणि राष्ट्राला समृद्ध करा. वाचाल तर वाचाल या म्हणी प्रमाणेच त्यांनी "लोळाल तर लोळाल" हा इशारा सुद्धा विद्यार्थ्यांना दिला. विद्यार्थी जीवनात आपल्या मनावर नियंत्रण ठेवा. मनामध्ये अफाट क्षमता आहे. त्यामुळे स्वतः न्यूनगंड न बाळगता आलेल्या अडचणींना सामोरे जा, असे आवाहनही त्यांनी केले.

या प्रसंगी इयत्ता दहावी आणि बारावी बोर्ड परीक्षेमध्ये विशेष यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा आणि त्यांच्या पालकांचा रोख रक्कम आणि ग्रंथ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. संजय गायकवाड यांनी केले. प्रास्ताविक कॉलेज विभाग प्रमुख प्रा. विजय वाघ यांनी केले तर ई. एस. भोसले यांनी आभार मानले. बक्षीस वितरणाचे निवेदन प्रा. डॉ. गीताराम पवार आणि एस. आर. कोल्हे यांनी केले.

# ढगाळ वातावरणाचा तुरीवर दुष्परिणाम

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** पश्चिम वऱ्हाडात सतत ढगाळ वातावरण व पाऊस तसेच सकाळी धुके पडत आहे. त्यामुळे तूर पिकावर वेगवेगळ्या किडी व रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. शेंगा पोखरणारी अळी ही अळी बहुभक्षी कीड असून 'हेलिकोव्हर्पा' नावाने ओळखली जाते. त्यावर वेळीच उपाययोजना करण्याचा सल्ला कृषी विभागाने दिला आहे. विदर्भात गेल्या पंधरवड्यापासून अवकाळी पावसाचा तडाखा सुरू आहे. गेल्या आठवड्यात अवकाळी पावसाने विश्रांती घेऊन सूर्यदर्शन होण्यास सुरुवात झाली. मात्र, गेल्या दोन दिवसांत पुन्हा ढगाळ वातावरण तयार झाले. या वातावरणाचा गंभीर दुष्पपरिणाम तूर पिकावर होत आहे. किडीचा प्रादुर्भाव पिकावर दिसून येत आहे. पूर्ण विकसित अळी पोपटी रंगाची असून त्यावर विविध रंगछटा आढळतात. आर्थिक नुकसान पातळी – एक मीटर रांगेत ३ ते ५ अळ्या किंवा १० ते २० अळ्या प्रति १० झाडे असतात. यासाठी नियंत्रणाकरिता १.५ टक्के निंबोळी अर्क अथवा इमामेक्टीन बेन्झोएट पाच एस.जी. तीन ग्रॅक किंवा कोरनॅन्ट्रॅनिपॉल १५.५ एस.सी. २.५ मिली. १० लिटर पाण्यात येऊन फवारावे, अशा सूचना कृषी विभागाने दिल्या आहेत. तुरीवरील पिसारी पतंग अळी हिरवट रंगाची, मध्यभागी फुगीर व दोन्ही टोकाकडे निमुळती होत गेलेली पाठीवर काटेरी लव लहान अळ्या फुले शेंगांना छिद्र पाडून त्यातील दाणे खावून नुकसान करतात.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त पैठण शहरात अभिवादन



आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 67 व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त पैठण शहरातील अआंबेडकर अनुयायी शहरात अभिवादन रॅली काढत महामानवाला पुष्प वाहून अभिवादन केले. रॅलीमध्ये उपासक, उपासीका, बालक, बालिका, वृद्ध हे पांढरे वस्त्र परिधान करून सहभागी झाले होते. सालाबादप्रमाणे पैठण शहरातील पावर हाऊस येथून सकाळी श्रावस्थी बुद्ध विहारात भंन्ते आनंद यांनी त्रिशरण, पंचशील चे पठण केले. त्यानंतर रॅलीला सुरुवात झाली. रॅली बसस्थानक. परीसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परीसरात आल्या नंतर उपस्थित भिम अनुयायांनी सामुहिक बाबासाहेबांना अभिवाद केले. यावेळी फुले शाहू आंबेडकरी विचाराचे प्रचारक प्राध्यापक लखण चव्हाण यांचे व्याख्यान झाले. यावेळी प्रारंभी पैठण पोलीस निरीक्षक संजय देशमुख यांनी बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर माजी नगराध्यक्ष दत्ताभाऊ गोर्डे, माजी नगराध्यक्ष सुरज लोळगे, नगर परीषदेचे मुख्याधिकारी संतोष आगळे, डॉ. पंडित किल्लारीकर, अरुण बल्लाळ, अँड पंकज काकडे, कैलास मगरे, पंकज.गायकवाड, अशोक बर्डे, जालिंदर आडसुळ, रावसाहेब आडसुळ, महेंद्र साळवे, बंडु अंधाळे, अशोक पगारे, राजु गायकवाड, अजित पगारे, राजेंद्र उगले, प्रकाश निकाळजे, जगन्नाथ साळवे, स्वप्नील साळवे, भारत आठवले, सिध्दार्थ रोडगे, गौरव आठवले,यांच्या सह मोठ्या संख्येने भिम अनुयायी उपस्थित होते. महापरिनिर्वाण दिनानिमित्त पुतळा परीसरात कृतज्ञता म्हणून तसेच ब्लड फॉर बाबासाहेब मिशन अंतर्गत रक्तदानाचा जागतिक रेकॉर्ड ब्रेक करण्याचा संकल्प असून हा संकल्प जगभरात राबवला जात आहे. रक्तदान शिबिरात 101 रक्तदात्यांनी रक्तदान करुन महामानवाला अभिवादन केले.

# लोणंद येथे ग्रंथालय निर्मितीतून महामानवास अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** पुस्तकांवर प्रचंड प्रेम करणारे विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी लोणंद ता.खंडाळा येथील पंचशील बुद्धविहारात पुस्तकांचा संच एकत्र आणून एक ग्रंथालय सुरू करण्यात आले.एक प्रकारे ग्रंथालयाची निर्मिती करून महामानवास अभिवादन करण्यात आल्याने या महत्त्वपुर्ण उपक्रमाचे कौतुक होत आहे.


महामानवास अभिप्रेत असणारे कार्य पंचशील बुद्धविहारातून करण्यात येत असल्याने नक्कीच हे बाबासाहेबांना खरे अभिवादन केल्यासारखेच आहे. भारतीय बौद्ध महासभेच्या पुरुष व महिला शाखेच्या वतिने हे अनोखे अभिवादन करण्यात आले.तसेच यावेळी एक वही एक पेन हा उपक्रम हाती घेण्यात आला होता.यातून वही आणि पेन दान स्वरूपात घेऊन गरीब व गरजू विद्यार्थ्यांसाठी हे वही पेन देण्याचा संकल्प करण्यात आला.सकाळी १० वाजता पंचशील बुद्ध विहार येथे बुद्ध वंदना घेऊन अभिवादन करण्यात आले.

यावेळी नगराध्यक्षा सिमा वैभव खरात,उपगराध्यक्ष रविंद्र क्षीरसागर,सहायक पोलीस निरीक्षक सुशील भोसले, डॉ. नितीन सावंत,सर्फराज बागवान, विरोधी पक्ष नेत्या दिपाली शेळके,नगरसेवक शिवाजीराव शेळके पाटील, गणीभाई कच्छी,सागर शेळके,सागर गालिंदे,अझगर इनामदार,हणमंतराव शेळके पाटील,स्वप्नील वाघमारे, राजूभाई इनामदार, इकबाल बागवान यांच्या सह बौद्ध उपासक उपासिका मोठया संख्येने उपस्थित होते. वाचाल तर वाचाल ही वाचन संस्कृती रुजविण्यासाठी तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे ग्रंथ व पुस्तके ही लोकांच्या वाचनात यावीत यासाठी ही ग्रंथालय निर्मिती करण्यात आलेली असून विविध स्वरूपाची वैचारिक प्रबोधन घडवून आणणारी पुस्तके या ग्रंथालयातून उपलब्ध असणार आहेत.लोणंद पोलीस स्टेशनच्या वतीने सात डझन वह्या तसेच नगरसेवक शिवाजीराव शेळके, गणीभाई कच्छी, सागर गालिंदे, वैभव खरात, दिपाली शेळके, राजेंद्र डोईफोडे भारतीय बौद्ध महासभेच्या पुरुष व महिला शाखेच्या पदाधिकारी यांनी प्रत्येकी एक डझन वह्या व पेन दान स्वरूपात दिले. लवकरच या वह्या व पेनाचे वाटप गरजू विद्यार्थ्यांना करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. ग्रंथालय निर्मिती आणि एक वही आणि एक पेन अशा महत्वपूर्ण उपक्रमातून सामजिक बांधिलकी जपणारे कार्य घडत असल्याने लोकांचकडून ही या उपक्रमास चांगला प्रतिसाद मिळाला.



महाराष्ट्र Business Katta









# पाकिस्तानी दहशतवाद: सार्कमध्ये मतभेद!



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**पार्श्वभूमी: दक्षिण आशियाई देशांनी एकत्रित येऊन स्थापन केलेली संघटना. या देशांनी एप्रिल १९४७ ते डिसेंबर १९८५ या काळात प्रदीर्घ चर्चा करून दिनांक ८ डिसेंबर १९८५ रोजी सार्क संघटनेची ढाका येथे स्थापना केली. या बाबतीत बांगला देशाचे तत्कालीन अध्यक्ष जनरल इर्शाद यांनी अंतिम पुढाकार घेतला होता. सुरुवातीला भारत, बांगला देश, श्रीलंका, मालदीव, पाकिस्तान, भूतान आणि नेपाळ हे सात देश या संघटनेचे सदस्य होते. दक्षिण आशियातील देशांचे समाजकल्याण आणि तेथील लोकांचा जीवनविकास, आर्थिक स्थितीत सुधारणा इत्यादी उद्दिष्टे समोर ठेवून ही संघटना तयार केली गेली.**

या सर्व देशांनी त्या वेळी कृषी, ग्रामीण विकास, दूरसंचार, हवामान, आरोग्य आणि लोकसंख्यावाढ या क्षेत्रांत एकात्मिक कृतिकार्यक्रम राबविण्याचे ठरविले. सार्कच्या स्थापनेनंतर अनेक देश या संघटनेत सदस्य किंवा निरीक्षक म्हणून सहभागी होण्यासाठी प्रयत्नशील होते. बऱ्याच वादावादीनंतर एप्रिल २००७ मध्ये अफगाणिस्तानला आठवा सदस्यदेश म्हणून या संघटनेत प्रवेश देण्यात आला. सध्या ऑस्ट्रेलिया, चीन, इराण, जपान, मॉरिशस, म्यानमार, दक्षिण कोरिया, अमेरिका हे आठ देश आणि युरोपियन युनियन ही संघटना यांना निरीक्षक देश म्हणून दर्जा देण्यात आला आहे. म्यानमारला लवकरच पूर्ण सदस्यत्व दिले जाईल, तर रशिया, दक्षिण आफ्रिका आणि टर्की हे देश निरीक्षक देशाचा दर्जा मिळावा म्हणून प्रयत्नशील आहेत.

रचना व कार्यः नेपाळची राजधानी काठमांडू येथे १६ जानेवारी १९८७ रोजी सार्कच्या सचिवालयाची स्थापना करण्यात आली. सार्कच्या सरचिटणीसची नियुक्ती सदस्य देशांमधून आळीपाळीने केली जाते. सदस्यदेशांमधल्या विविध शहरांतून विविध समित्यांमार्फत सार्कचे काम चालते. सार्कची वार्षिक परिषद वर्षातून एकदा देशांच्या नावाच्या आकारविल्हेनुसार त्या-त्या देशात भरते. तत्पूर्वी या देशांच्या परराष्ट्रमंत्र्यांची वर्षातून दोनदा बैठक होते आणि त्या बैठकीला सदस्यदेशांचे राष्ट्रप्रमुख- पंतप्रधान उपस्थित राहतात. पूर्वी सदस्यदेशांतील मतभेदांमुळे या बैठका सौहार्दपूर्ण वातावरणात होत नसत. पाकिस्तान दहशतवाद्यांना देत असलेल्या पाठिंब्यामुळे आणि भारतात उरी येथील लष्करी तळावर झालेल्या हल्ल्यानंतर भारत, बांगला देश, भूतान आणि अफगाणिस्तान या देशांनी नोव्हेंबर २०१६मध्ये पाकिस्तानात होणा-या सार्कच्या बैठकीवर बहिष्कार घातला होता. त्यामुळे ही बैठकच रद्द करावी लागली. सदस्यदेशांच्या अंतर्गत वादाचा सार्कच्या कामावर परिणाम होऊ नये, म्हणून सार्कच्या बैठकीत युद्ध किंवा दोन देशांमधील संघर्ष यावर सहसा चर्चा होत नाही. पण संबंधित देशांना या बैठकीच्या वेळी परस्पर चर्चा करण्याची संधी सार्क देते. सार्कच्या शिखर परिषदांमध्ये दहशतवादाविरुद्ध लढण्यासाठी सदस्यराष्ट्रांच्या व्यापक सहकार्यावर नेहमीच भर देण्यात आला आहे. २०१५च्या आकडेवारीनुसार सार्कमध्ये जगाच्या क्षेत्रफळाच्या ३ टक्के भूभाग समाविष्ट होता, तर जगाच्या लोकसंख्येच्या २१ टक्के लोकसंख्या या देशांची होती. सदस्यदेशांमध्ये आर्थिक आणि क्षेत्रीय सहकार्य वाढावे यासाठी सार्क नेहमीच प्रयत्नशील असते. निरीक्षक या नात्याने सार्कचे संयुक्त राष्ट्रसंघाशी कायमस्वरूपी राजनैतिक संबंध आहेत. युरोपियन युनियन व अन्य अनेक आंतरराष्ट्रीय संघटनांबरोबर सार्कने मैत्रीपूर्ण संबंध ठेवले आहेत. सार्कने अल्पकाळात विविध आघाड्यांवर लक्षणीय प्रगती केली आहे. दक्षिण आशियाई मुक्त व्यापार क्षेत्र या सार्क अंतर्गत संघटनेची स्थापना सन २००६मध्ये करण्यात आली. सदस्यदेशांमधील व्यापारवृद्धीबाबत या संघटनेला चांगलेच यश मिळाले आहे. सार्क अंतर्गत देशांमधील प्रवासासाठी व्हिसाच्या २४ प्रकारांच्या अटी शिथिल करण्यात आल्या. महिला व बालकल्याण, शांतता, विकास, दारिद्र्य निर्मूलन, पर्यावरणरक्षण आणि प्रादेशिक सहकार्य या क्षेत्रांत सार्कच्या कामात सहकार्य करणाऱ्यांना अनेक पारितोषिके जाहीर करण्यात आली. सदस्यदेशांतील



नामवंत लेखक आणि युवकांसाठीही सार्क पुरस्कार जाहीर करण्यात आले. सार्क देशांतील ऐक्य अधिक दृढ करण्यासाठी सार्कचे गीत तयार करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. भारताने सार्क देशातील संपर्कासाठी एक दळणवळण-उपग्रह देण्याचे मान्य केले आहे. या उपग्रहासाठी २३५ कोटी रुपये खर्च येणार असून तो सर्व खर्च भारतच देणार आहे. पाकिस्तानचा या योजनेला विरोध आहे. त्यामुळे पाकिस्तान वगळता अन्य सार्क देशांनी या उपग्रहाचा वापर करण्याचे ठरविले आहे. "सीमाविरहित ज्ञान" असे घोषवाक्य असलेले एक दक्षिण आशियाई विद्यापीठ भारताने नवी दिल्ली येथे सुरू केले आहे. या विद्यापीठात अनेक विषयांतील संशोधनाची सोय असून अत्यंत समृद्ध असे ग्रंथालय उभे करण्यात आले आहे. सार्क आणि अन्य देशांतील विद्यार्थी सन २०१४पासून या विद्यापीठात शिक्षण घेत आहेत. सुमारे ७ हजार विद्यार्थी या विद्यापीठात शिक्षण घेऊ शकतील. संघटनेच्या सदस्यदेशांमध्ये या विद्यापीठाच्या संलग्न शाखा असतील व तेथेही या विद्यार्थ्यांना संशोधन करता येईल. नवी दिल्लीतील इग्नू विद्यापीठ आणि असोला अभयारण्य यांच्या दरम्यान या विद्यापीठासाठी १०० एकर जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

मूल्यमापनः भारत आणि अन्य सदस्यदेश यांची महत्त्वाची भूमिका असलेल्या अनेक जागतिक व प्रादेशिक संघटनांबरोबर सार्कचे मैत्रीपूर्ण संबंध आहेत. त्यामध्ये एशिया को-ऑपरेशन डायलॉग- एसीडी- ३४ देश, साऊथ एशिया सब रीजनल इकॉनॉमिक को-ऑपरेशन- एसएएसईसी- ६ देश, मेकाँग गंगा को-ऑपरेशन- एमजीसी- ६ देश, इंडियन ओशन रिम असोसिएशन- आईओआरए- २१ देश, बांगला देश, भूतान, भारत, नेपाळ सहकार्य- बीबीआईएन- ४ देश आणि बंगालच्या उपसागरानजीकच्या देशांची परिषद- बीआईएमएसटीईसी- ७ देश या संघटनांचा यात समावेश होतो. या संघटनांमुळे सार्कला स्थैर्य प्राप्त झाले आहे. दहशतवादाला उघडउघड पाठिंबा देणाऱ्या पाकिस्तानमुळे सार्कमध्ये मतभेद निर्माण झाले असून या भूप्रदेशातील शांततेला बाधा निर्माण झाली आहे.

अफगाणिस्तान हा मध्य आशियातील देश असल्यामुळे त्याला प्रवेश देताना सार्कच्या सदस्यदेशांमध्ये खूपच वाद झाले होते. दक्षिण आशियाई देश कुणाला म्हणायचे, यावरून हा वाद निर्माण झाला होता. सार्कमधील सर्वच देशांना विकासासाठी खूप वाव असल्याने अनेक देश निरीक्षक म्हणून या संघटनेत सहभागी झाले आहेत. धोरण आणि उद्दिष्टांची पूर्तता करण्याबाबत सार्कचा प्रभाव हा नेहमीच वादाचा विषय राहिला आहे.

# प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेत मयत शेतकऱ्यांच्या वारसांची उपेक्षा

## तहसील कर्मचाऱ्यांची उडवाउडवी : विधवा महिला शेतकरी त्रस्त

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत पाटील**

**वाशिम :** रिसोड तहसिल कार्यालयाअंतर्गत येत असलेल्या प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेतील लाभधारक परंतू मयत झालेल्या शेतकऱ्यांच्या वारसास सदर योजनेचा लाभ मिळत नाही. योजनेच्या लाभधारक यादीत नाव नोंदणी करण्यासाठी मयत शेतकऱ्यांचे वारस तहसील कार्यालयाचे उंबरठे झिजवत असून, संबंधीत कर्मचारी त्यांना उडवाउडवीचे उत्तरे देत आहेत. अशी तक्रार काही विधवा महिलाशेतकऱ्यांनी केली आहे. परिणामी किसान सन्मान योजनेत महीलाशेतकऱ्यांची उपेक्षा होत असल्याचे दिसून येते आहे. या गंभीर बाबीकडे सन्माननीय महीला तहसिलदार प्रतिक्षा तेजनकर यांनी लक्ष द्यावे अशी मागणी वंचीत शेतकऱ्यांनी केली आहे.

पी एम किसान योजनेचा हप्ता मिळत नसल्याने शेतकरी तहसील भोवती चक्रा मारून त्रस्त झाले तर तहसील विभागातील कर्मचारी शेतकऱ्यांना हे काम आमच्याकडे नाही ते काम कृषी विभागाकडे आहे असे सांगून जबाबदारी लोटून देत आहेत महसूल प्रशासन व कृषी विभाग या दोघांची जबाबदारी असतानी सुद्धा हे एकमेकांवर लोटत असल्याने शेतकऱ्यांना किसान योजनेचा लाभ मिळत नाही मात्र सदर बाबीकडे बळीराजा या बॅनरखाली निवडून आलेले स्थानिक आमदार अमित झनक यांचे सुद्धा दुर्लक्ष झा ले आहे खासदार खासदार धोत्रे यांना तर तालुक्यातील शेतकऱ्या विषयी कोणतीच आस्था नसल्याने कामे प्रलंबित झाल्याचे शेतकरी म्हणत आहे  शेतकरी यांचा कैवारीच राहिला नसल्यानेतालुक्यात शेतकऱ्यांच्या समस्या दिवसेंदिवस वाढत आहेत असे दिसून येत आहेपंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्यांना आर्थिक मदत व्हावी याकरिता पीएम किसान निधी योजना चालू केली योजनेचा पंधरावा हप्ता लाखो शेतकऱ्यांना त्यांच्या खात्यात जमा झाला मात्र रिसोड तहसील व कृषी विभागाच्याहलगर्जीपणामुळे  वहेवा





तहसील कार्यालयात बऱ्याच वेळा कागदपत्र देऊन ही . पहिला नो सिडिंगचा प्रॉब्लेम आता पात्र असूनही अपात्र असल्याचा प्रॉब्लेम निर्माण झाल्यानेच पीएम किसान योजनेच्या लाभापासून पासून मी वंचित आहे .
**दामोदर राऊत,  शेतकरी, रिसोड )**
मी, रिसोडतालुक्यातील बिबखेडा येथील विधवा शेतकरी असून माझे पती मृतुनंतर मी वारस या नात्याने पी एम किसान योजनेच्या लाभ मिळण्याकरिता बऱ्याच वेळा अर्ज केला तर बऱ्याच वेळा वेबसाईट सुरू नसल्याने तहशील भोवती चकरा मारल्या आणि साईड चालू झाल्यानंतर ते कागदपत्र तहसील मधील कर्मचाऱ्याकडे सादर करू नये पतीच्या मृत्यूनंतर मी वारस असूनही त्या योजनेपासून वंचित राहत आहे .
**निर्मला प्रल्हाद इंगळे रिसोड, विधवा शेतकरी महिला**

दाव्यामुळे बरेच शेतकरी सीडींग,व हजारो शेतकरी पात्र असल्याचे पुरावे तलाठ्याकडून तहसील कार्यालयातील काम चुकार कर्मचाऱ्याकडे देऊनही अपात्र आहे  2022 पासून शेतकरी तहसील भोवती चक्रामारू नये वंचित राहत असल्याचे शेतकऱ्यांना मिळणाऱ्या पीएम किसान योजनेच्या हप्त्यावरून दिसते मात्र या गोष्टीकडे तहसीलदार कृषी अधिकारी लक्ष देत नसल्याने हजारो शेतकरी पीएम किसान योजना या योजनेपासून वंचित राहत आहेत सदर बाबीकडे जिल्हाधिकारी व जिल्हा कृषी अधिकारी यांनी लक्ष घालून वंचित राहणाऱ्या शेतकऱ्यांना दिलासा द्यावा ज्यावेळेस पीएम किसान योजना अस्तित्वात आली तेव्हा सर्व शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये जमा होत गेले मात्र कोरोनाच्या काळात लँड सिडिंग चा प्रॉब्लेम तयार होऊन शेतकऱ्यांनी तहसील भोवती चक्रा मारणे सुरू केले परंतु पी एम किसान योजनेची साईड सुरू नसल्याचे कारण सांगून शेतकऱ्यांना भुलतापी पाडून तहशील भोवती चकरा मारणार्या शेतकऱ्यांना समज देण्यात आली आणि पुढील येणाऱ्या हप्त्यात तुमचे काम होईल असे बोलून समाधान केले कर्मचाऱ्यांच्या खोळसाड भुलतापी घालणाऱ्या व व दुसरीकडे पीएम किसान योजनेची वेबसाईट सुरू नसल्याचे सांगून मृत्यू झालेल्या शेतकऱ्यांच्या वारस पत्नीला रजिस्ट्रेशन होत नसल्याने सांगून शेतकऱ्यांना पीएम किसान योजने पासून वंचित राहण्याची वेळ आली व हजारो शेतकरी वंचित राहत आहेत तालुक्यातील बऱ्याच शेतकऱ्यांना पी एम किसान योजनेचाहप्ता कोण्या खात्यात जमा होतो हे सुद्धा माहीत होत नसल्याने शेतकरी त्रस्त झाले आहे.

# पावसाअभावी खरीप गेले; आता ढगाळ वातावरणाने रब्बी पिके धोक्यात

## साहेब सांगा शेती करावी कशी : गेल्या वर्षीच्या सततच्या पावसाच्या अनुदानापासून बरेच शेतकरी वंचित

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** यावर्षी जिल्ह्यात झालेला अत्यल्प पाऊसामुळे शेतकऱ्यांना खरीप पिकाचा चांगलाच फटका बसला कमी पर्जन्यमानामुळे पाणी पातळीत वाढ झाली नाही.तरीही शेतकऱ्याने हार न मानता नव्याने रब्बी पिकासाठी आपले कंबरडे कसून ज्वारी, हरभरा, गहू पिकांची पेरणी केली. खरी पण गेल्या आठवड्याभरापासून ढगाळ वातावरण व अवकाळी पावसाने शेतात उभी असलेली तुर, कांदा, ज्वारी, हरभरा, गहू पिके या वातावरण बदलामुळे रोगराई च्या गराड्यात सापडली आहेत.

"पाऊस न पडल्यामुळे खरीप गेलं आणि आता अवकाळी पावसाने रब्बी जातय"

दुष्काळाच्या गडद छायेत अडकलेल्या शेतकऱ्यांमधून, "साहेब सांगा शेती करू कशी? असाच प्रश्न विचारला जात आहे."

कारण सोयाबीननंतर तूर या पिकावर शेतकऱ्यांची भिस्त आहे. यंदा तुरीला चांगला बाजारभाव ही असल्याने तूर उत्पादनामधून शेतकऱ्यांना मोठ्या अपेक्षा निर्माण झाल्या आहेत. पण ऐन शेंगा भरण्याच्या आवश्यक असताना तुरीवर अळीचा प्रादुर्भाव वाढत चालला आहे. यामुळे पीक धोक्यात सापडले आहे. गेल्या वर्षी देखील परतीच्या पावसामुळे.धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या तूर पिकाचे नुकसान झाले होते. आणि यावर्षी शेंगा पोखरणाऱ्या अळीमुळे उत्पन्नात मोठ्या प्रमाणात घट होण्याची शक्यता आहे. त्याबरोबरच तीन ते चार दिवसांपासून असलेले ढगाळ वातावरण पुन्हा शेतकऱ्यांची चिंता वाढवत आहे. ढगाळ वातावरणामुळे हरभरा पिकावर अळी,मर व इतर किडींचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. या रोगांच्या नियंत्रणासाठी फवारणी करण्यासाठी शेतकऱ्यांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे.

गहू, हरभऱ्यानंतर आता कांदा उत्पादक शेतकरी देखील संकटात सापडला आहे. कारण बदलत्या हवामानाचा कांदा पिकावर देखील मोठा परिणाम होताना दिसत आहे. तर दुसरीकडे रब्बी हंगामातील ज्वारी पिकावर लष्करी अळीचा प्रादुर्भाव झालाआहे. यामुळे शेतकरी, चारा पीक घेणारे पशुपालक पुरते हवालदिल झाले आहेत. कृषी विभागाने तातडीने लक्ष देण्याची गरज एखाद्या किडीचा प्रादुर्भाव पिकावर होताच कृषी विभागाने माहितीपर शिबिराचे आयोजन करणे गरजेचे आहे. कारण यापूर्वी लष्करी अळीने मका पिकाचे प्रचंड नुकसान केले. आता लष्करी अळीने ज्वारीचे नुकसान करण्यास सुरूवात केली असताना मार्गदर्शनासाठी कृषी विभागाने तातडीने गावोगावी शिबिरांचे आयोजन करावे व शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन करावे अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.






# करणी सेनेचे अध्यक्ष हत्याकांड; धुळ्यात निदर्शने

## मारेकऱ्यांना कठोर शिक्षा करण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** राष्ट्रीय राजपुत करणी सेनेचे अध्यक्ष सुखदेवसिंह गोगामेडी यांची गोळया झाडून हत्या करण्यात आली आहे. तरी त्या सर्व आरोपीना अटक करण्यात यावी व अटक करुन कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी यासाठी राष्ट्रीय राजपूत करणी सेनेतर्फे निवेदन देऊन जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी करण्यात आली.

राजपुत समाजाच्या न्याय हक्कासाठी नेहमीच प्रयत्नशील असणारे राजपुत करणी सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. सुखदेवसिंह गोगामेडी यांच्यावर भ्याड हल्ला गोळया झाडून करण्यात आला आहे. या हत्येचा धुळे जिल्हा राजपुत समाजाकडून मोर्चा काढून व निदर्शने करून जाहिर निषेध करण्यात आला. तरी या गुन्हयाच्या मारेकऱ्यांना कायदेशीर फाशीची शिक्षा देण्यात यावी ही समस्त धुळे जिल्हा राजपुत समाजाच्या वतीने मागणी करण्यात आली.

# चंद्रपूर येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचा व्याघ्र सफारी प्रकल्प करणार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** विदर्भ ही वाघांची भूमी आहे; जैवविविधतेने संपन्न असलेल्या या भूमीत देश विदेशातील पर्यटक दरवर्षी मोठ्या संख्येने येतात; याच पार्श्वभूमीवर चंद्रपूर येथे जागतिक दर्जाची व्याघ्र सफारी प्रकल्प करण्याचा संकल्प असून यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सल्लागारांची मदत देखील घेता येईल; यामुळे पर्यटनाला चालना मिळेल आणि परिसरात रोजगार निर्मिती व अर्थकारण मजबूत होण्यास निश्चित मदत होईल यासाठी वन अधिकाऱ्यांनी सूक्ष्म नियोजन करावे अश्या सूचना राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य आणि मत्स्यव्यवसाय मंत्री तथा पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी दिल्या. नागपूर येथे यासंदर्भात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते.
या बैठकीला प्रधान सचिव श्री वेणुगोपाल रेड्डी, वनबलप्रमुख श्री शैलेंद्र टेंभुर्णीकर, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) श्री महिप गुप्ता, वनविकास महामंडळाचे सिजिएम श्री संजीवकुमार, श्री प्रशांत झुरमुरे, श्री कल्याणकुमार यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते. यावेळी एक सादरीकरण ना. सुधीर मुनगंटीवार यांना दाखविण्यात आले.
चंद्रपूर-मूल मार्गावर वनप्रबोधिनी जवळील प्रशस्त वनक्षेत्रात व्याघ्र सफारी प्रकल्प व्हावा असा संकल्प असून केवळ व्याघ्र सफारीपुरता हा मर्यादित न ठेवता इतर वन्यजीवांचाही या सफारीत समावेश व्हावा यासाठी प्रयत्न व्हावा;अश्या प्रकल्पातून संशोधन व्हावे अशीदेखील अपेक्षा यावेळी ना. सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली. ना. मुनगंटीवार म्हणाले कि, सर्व वयोगटातील पर्यटकांना आकर्षित करणारे नवीनतम, अत्याधुनिक दर्जाचे विरंगुळा केंद्र या ठिकाणी व्हावे यादृष्टीने नियोजन करणे आवश्यक असून तेथे असलेल्या वन्यजीवांची माहीती, त्यावर एखादा माहितीपूर्ण शो पर्यटकांसाठी करता येईल का, याचाही विचार करावा अशा सूचना यावेळी दिल्या.





# सोनगीर पोलिसांची गुटख्यावर कारवाई; ट्रक चालकसहित लाखोंचा मुद्देमाल जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** सोनगीर पोलीसांनी दिल्लीवरून येणाऱ्या गुटख्याचा कंटेनर ट्रक पकडुन कारवाई करुन ट्रक चालक सहित 21,61,320/- रुपये किंमतीचा मुददेमाल हस्तगत केला आहे. दिनांक 06/12/2023 रोजी कंटेनर ट्रक क्रमांक MH04 KU5448_हिच्यात महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलले अपायकारक पानमसाला व गुटख्याचा महाराष्ट्र राज्यात विक्री करण्याचे उददेशाने दिल्लीकडुन धुळेकडे येत आहे अशी बातमी मिळाल्यावरुन सोनगीर पो.स्टे.चे अधिकारी व कर्मचारी हे सोनगीर टोल नाक्याजवळ जावुन थांबले असतांना दिनांक 06/12/2023 रोजी दुपारी 3.30 वाजेच्या सुमारास सोनगीर टोलनाक्यावर सदर वाहन चालकास थांबवुन सदर गाडीची तपासणी केली असता त्यात राजनिवास, विमल, राजश्री, झेड एल-01 व पानमसाला व तबाकुच्या गोण्या भरलेल्या 32 बॉक्स मिळुन आले आहेत. सदर वाहनावर कारवाई केली असुन सदर कारवाईत सुमारे 06,61,320 /- रुपये किंमतीचा पानमसाला (गुटखा) व 15,00,000/- किंमतीचा कंटेनर ट्रक क्रमांक MH04 KU5448_असा एकुण 21,61,320/- रुपये किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आले आहे. सदर वाहनावरील चालक यांना ताब्यात घेण्यात आलेले आहे. अन्नसुरक्षा अधिकारी यांना माहिती देण्यात येवुन गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे. सदर कारवाई श्रीकांत धिवरे, पोलीस अधिक्षक धुळे, किशोर काळे, अपर पोलीस अधिक्षक व सचिन हिरे उपविभागीय पोलीस अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक सचिन कापडणीस, असई/किरण राजपुत पोहेकॉ/ नरेंद्रसिंग गिरासे, पोहेकॉ/संजय देवरे, पोना/अमरीश सानप, पो.कॉ. राहुल पाटील, विजयसिंग पाटील यांनी केलेली आहे.

# बुलडाणा डॉक्टर्स प्रीमिअर लीगचा शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** संपूर्ण महाराष्ट्रातील आरोग्य क्षेत्रात चर्चेत असलेली बुलडाणा डॉक्टर्स प्रीमियर लीग अर्थात बी डी पी एल क्रिकेट स्पर्धा यावर्षी लोणार डॉक्टर असोसिएशन च्या वतीने लोणार क्रिकेट क्लबच्या भव्य मैदानावर आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेचा भव्य शुभारंभ ६ डिसेंबर करण्यात आला. या उदघाटन सोहळ्यात प्रमुख अतिथी असलेले डॉ.अनिल गाभणे, डॉ. पी. ई.पाटील,डॉ.निलेश गट्टानी,डॉ.के.बि. मापारी, आयोजन समितीचे अध्यक्ष गजानन सोसे यांच्या हस्ते शिवरायांच्या व धन्वंतरी प्रतिमेचे पूजन करून स्पर्धेला सुरवात करण्यात आली. यावर्षी या स्पर्धेचे ८ वे पर्व असून या स्पर्धेत जिल्हाभरातील डॉक्टर्सचे १९ संघ सहभागी झाले असून ही स्पर्धा १७ डिसेंबर पर्यंत सुरु असणार असल्यामुळे जिल्हाभरातून क्रिकेटप्रेमी मोठया उत्साहात या ठिकाणी हजेरी लावून क्रिकेटचा आनंद घेणार आहे. लोणार डॉक्टर असोसिएशन व लॅब असोसिएशनच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून यासाठी उच्च दर्जाची पीच व उत्कृष्ट मैदान मेहकर रोडवर तयार करण्यात आले आहे.यास्पर्धेचे युट्यूब चॅनल वर प्रक्षेपण करण्यात येत असून लोणार सारख्या ग्रामीण भागात प्रथमच एवढी भव्यस्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.
या स्पर्धेसाठी लोणार डॉक्टर असोसिएशनची टीम व सर्व पदाधिकाऱ्यांनी स्पर्धा यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले आहेत.त्यांच्या या अप्रतिम आयोजनाचे उदघाटक डॉ. अनिल गाभणे यांनी कौतुक केले तसेच अशा स्पर्धा खेळल्यामुळे डॉक्टरांचे आरोग्य सुद्धा चांगले राहते असे प्रतिपादन लोणार डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. के.बी.मापारी यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डा.भास्कर मापारी यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. प्रदीप झोरे यांनी केले.



# स्व. किसनराव सदार विद्यालयास गटशिक्षण अधिकारी यांची भेट

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** तालुक्यातील खडकी सदार येथील स्व. किसनराव सदार विद्यालयास रिसोड पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी श्री कोकाटे यांनी आकस्मित भेट दिली. यावेळी शाळेत सुरु असलेल्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन केले.

गटशिक्षणाधिकारी कोकाटे साहेब यांनी शाळेला आकस्मित भेट. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिना निमित्त शाळेत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांमध्ये सर्वप्रथम त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन केले. दरम्यान पं.स. समन्वयक मा.श्री साखरकर, मा.श्री मापारी, कावरखे मॅडम आदींनी सुद्धा बाबासाहेबांच्या प्रतिमेचे पूजन केले. त्यानंतर शाळेचे मु.अ.श्री जाधवसर यांनी गटशिक्षणाधिकारी कोकाटे साहेब यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. तद्वतच इतर मान्यवरांचे सुद्धा स्वागत शाळेच्या शिक्षकांनी स्वागत केले. गटशिक्षणाधिकारी मा.श्री कोकाटे, यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बहुमोल कार्यावर प्रकाश टाकून, त्याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांना परीक्षेचे महत्त्व पटवून देत त्याअनुषंगाने अभ्यासाविषयी मार्गदर्शन केले. वर्ग 10 वी च्या विद्यार्थ्यांना




परीक्षेच्या शुभेच्छा दिल्या. त्यानंतर गटशिक्षण अधिकारी मा.श्री कोकाटे यांनी शालेय परिसराची पाहणी केली. शाळेचे प्रगतीपथावरील काम पाहून समाधान व्यक्त केले. त्याबद्दल शाळेने त्याचे आभार मानले. यावेळी कार्यक्रमासाठी शाळेतील शिक्षक बकाल सर, वायाळ सर, वाठोरे सर, फुपाटे सर, माधव खडसे सर, मार्कंड सर, कोरडे सर यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.



# अवैध सावकारी करणाऱ्याविरोधात धाडसत्र

## चार अवैध सावकारविरोधात कारवाई : आक्षेपार्ह कागदपत्र जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत पाटील**

**वाशिम :** तालुक्यात अवैध सावकारीचा व्यवसाय जोमात सुरू असून, सर्वसामान्य गोरगरीब जनतेचे विशेषतः शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण होत असल्याच्या संशयावरून सहकार व पोलीस विभाकडून अवैध सावकार विरोधात धाडसत्र सुरु करण्यात आले आहे. सदर धाडीत तालुक्यातील चार अवैध सावकाराविरोधात कारवाई करण्यात आली असून, अवैध सावकारी संबंधी काही आक्षेपार्ह कागदपत्र जप्त करण्यात आली आहेत. परिणामी तालुक्यात अवैध सावकारी करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

रिसोड तालुक्यातील विविध व्यक्तींकडून सहकार विभागाकडे प्राप्त झालेल्या अवैध सावकारी व्यवहारासंबंधीच्या चौकशीकरीता सहकार विभाग व पोलीस विभागाच्या 4 संयुक्त पथकाने रिसोड शहरातील केशवनगर येथील वंदना अग्रवाल,रिसोड तालुक्यातील लेहणी येथील प्रदीप तिफणे,गोवर्धन येथील परसराम सोनुने व मथुरानगर येथील नारायण भावसार यांच्यावर आज 6 डिसेंबर रोजी अवैध सावकारी व्यवहारासंबंधाने कारवाई करून मालमत्तेची व इतर कागदपत्रे ताब्यात घेऊन  कारवाई करण्यात आली.
या कारवाईदरम्यान काही ठिकाणी कथीत अवैध सावकारी व्यवहारासंबंधीत चौकशीकरीता आवश्यक असलेली कागदपत्रे,स्थावर मालमत्तेची खरेदी खते ताब्यात घेण्यात आली आहे.एका प्रकरणात कोरे बाँड,धनादेश आदी कागदपत्रेसुध्दा ताब्यात घेण्यात आली.त्यानुसार सावकारी कायदयाअंतर्गत चौकशी सुरु करण्यात आली आहे. ही कारवाई जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस.,जिल्हा पोलीस अधिक्षक अनुज तारे व अमरावतीचे विभागीय सहनिबंधक व्ही.डी. कहाळेकर यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली. या कारवाईसाठी यवतमाळ येथील सहकारी संस्थेचे उपनिबंधक नानासाहेब चव्हाण यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. या कारवाईत वाशिम येथील सहाय्यक निबंधक (प्रशासन) आर. आर.सावंत,सहाय्यक निबंधक एम. डी.कच्छवे,सहकार अधिकारी एम. बी.बनसोडे व मंगरूळपीरचे सहकार अधिकारी पि. एन.झळके यांनी पथक प्रमुख म्हणून काम केले.यावेळी  कारंजाचे सहकारी अधिकारी एन.के. मेहकरकर,वाशिम येथील सहकारी अधिकारी पी.आर.वाडेकर,मुख्य लिपीक डी.यू. खुरसडे,मालेगांव येथील सहकारी अधिकारी के.जी.चव्हाण, मंगरुळपीर येथील सहकार अधिकारी श्रीमती एम.के.जाधव, मानोरा येथील सहकार अधिकारी एस.पी.सांगळे, वाशिम येथील सहकार अधिकारी श्रीमती बी.ए.इंगळे, रिसोड येथील मुख्य लिपीक एस.पी.रोडगे व मंगरुळपीर येथील लिपीक केशरी राठोड यांनी यावेळी सहाय्यक म्हणून कामकाज केले. या कारवाईकरीता रिसोड येथील प्रभारी सहाय्यक निबंधक बी. बी.मोरे आणि वाशिम येथील सहायक अधिकारी एस.जी.गादेकर यांनी आवश्यक ते नियोजन व व्यवस्था केली. जिल्ह्यातील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,त्यांनी अवेध सावकारी व्यवसाय करणाऱ्यांवर प्रभावी नियंत्रण व कारवाई करण्याकरीता सहकार विभागाचे तालुका सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था कार्यालये तसेच जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था तथा जिल्हा निबंधक (सावकारी) वाशिम कार्यालयाकडे गोपनीय स्वरुपाच्या तक्रारी दाखल करून अशा व्यक्तींची माहीती द्यावी.असे आवाहन जिल्हा निबंधक (सावकारी) दिग्विजय राठोड यांनी केले आहे.

**कारवाई झाली,पण गुन्ह्याची नोंद कधी ?**



अवैध सावकाराचा पाश हा आर्थिकदृष्ट्या पिचलेल्या सर्वसामान्य गोरगरीब जनतेसाठी " शाप " ठरत आहे . आर्थिक अडचानिपोटी अनेकांना तुटपुंज्या रकमेसाठी आपली लाखो रुपयांची स्थावर मालमत्ता अवैध सावकाराकडे गहाण ठेवावी लागते . अवैध सावकारीत मनमानी व्याज दर आकारल्या जात असल्यामुळे अनेकांना आपली गहाण ठेवलेली मालमत्ता अखेर सावकाराच्या घशात घालावी लागते . असे गंभीर प्रकार अनेकांसोबत आजवर घडले असल्याची अनेक उदाहरणे सर्वश्रुत आहेत . त्यामूळे आक्षेपार्ह कागदपत्र जप्त करुन कारवाई केल्याबद्दल सहकार व पोलीस विभाग यांच्याप्रती समाधान व्यक्त होत आहे .मात्र कारवाई नंतर गुन्ह्यांची नोंद कधी . . ? असा प्रश्न संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष गोपाल खडसे यांनी केला आहे . **गोपाल पाटील खडसे, ( तालुकाध्यक्ष, संभाजी ब्रिगेड )**




# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** मुंबई दादर या ठिकाणी वंचित बहुजन माथाडी ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार युनियनच्या वतीने आदरणीय सुरेशजी मोहिते साहेब (महाराष्ट्र सरचिटणीस) यांच्या आदेशानुसार परमपूज्य बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६७ व्या महापरिनिर्वाण दिन निमित्त मुंबईची लाईफ लाईन असणारे माथाडी कामगार, रिक्षावाले, फेरीवाले, हॉस्पिटल कर्मचारी, घर काम करणारे महिला, सर्व कामगारांच्या न्याय हक्कासाठी एकत्रित येऊन या रॅलीमध्ये हजारो संख्येने शामिल झाले व अभिवादन करण्यात आले. त्याच मुख्य भूमिका घेणारे  प्रदीप गौतम साळवे (नवी मुंबई निरीक्षक व घाटकोपर तालुका अध्यक्ष), सोबत असणारे, सुनील लोखंडे (मुंबई सचिव), युसूफ भाई अन्सारी (शिवाजीनगर मानखुर्द तालुका अध्यक्ष), शर्मिला ताई गायकवाड (ठाणे जिल्हा निरीक्षक), गौतम गवई (ठाणे जिल्हाध्यक्ष), पंकज सरोदे साहेब (वंचित बहुजन आघाडी आंबेगाव तालुका उपाध्यक्ष),नयनाताई सरवडे (अंबरनाथ तालुकाध्यक्ष), रमेश साळवे (फुड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया प्रमुख), नितीन गोरे (नवी मुंबई जिल्हाध्यक्ष) विनोद नरवडे (ईशान्य मुंबई जिल्हाध्यक्ष), सचिन साळुंखे (मुंबई सचिव), रोहन भिसे, सिद्धार्थ आस्वारे( घाटकोपर तालुका महासचिव), सचिन केदारे (घाटकोपर तालुका सरचिटणीस), राहुल साळवे (घाटकोपर तालुका सचिव), ए. आर पटेल (कळवा मुंब्रा शहराध्यक्ष) बजरंग भाऊ तुपे (माता रमाबाई आंबेडकर नगर रिक्षा स्टॅन्ड अध्यक्ष), सुरजभाई गिरी (कामराज नगर रिक्षा स्टॅन्ड अध्यक्ष) व सर्व युनियनचे कार्यकरणी उपस्थित होते.

# लॉकडाऊननंतर प्रथमच मोलखेडा गावात पहिल्यांदाच पोहोचली लालपरी

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील मोलखेडा गावात लॉकडाऊन लागल्यापासून बससेवा ही बंदच होती. त्यामळे विद्यार्थी व जेष्ठ नागरिक यांना नाहक त्रास सहन करावा लागत होता. सरपंच मनिषाताई ज्ञानेश्वर वारंगणे, ग्रामपंचायत सदस्य अतुल इंगळे व गावकऱ्यांनी वेळोवेळी सोयगाव येथे जाऊन हिरालाल ठाकरे आगार प्रमुख यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे निवेदन देण्यात आले आले ते शेवटी सेवानिवृत्त झाले पण विद्यार्थी यांची बस चालू करा म्हणून दाखल घेतली नाही.परंतु नव्यानेच रुजू झालेले आगार प्रमुख विजय काळवणे यांच्या कडे लेखी निवेदन देताच त्यांनी तात्काळ दखल घेऊन विद्यार्थी व जेष्ठ नागरिक यांची होणारी गैरसोय टाळली आणि तात्काळ दि.७/१२/२३ रोजी पासून मोलखेडा हून सकाळी एक बस सात वाजता तरी दुसरी साडेनऊ वाजता विद्यार्थ्यांसाठी चालू करुन दिली आहे. मोलखेडा गावात तब्बल तीन वर्षे नंतर बस पोहोचली. गुरुवारपासून बस सेवा सूरू झाल्याने यूवक आबालवृद्धांनी एकत्र येऊन जल्लोष साजरा केला.या दोन्ही बस सोयगाव ते सावळदबारा हून सोयगाव कडे जाताना मोलखेडा मार्गे देवळगाव गुजरी, फत्तेपूर व सोयगाव जाईल.सोयगाव आगार बस सेवा  सूरू करण्यात आली आहे. देश स्वतंत्र होऊन ७६ वर्ष पूर्ण झाली. पण डोंगरकाठच्या आडवळणावर वसलेल्या गावांमध्ये बससेवा उपलब्ध नव्हती. गावात बस सेवा नसल्याने येथील ग्रामस्थ, रुग्ण, विद्यार्थी व विद्यार्थिनींना शालेय शिक्षणासाठी तारेवरची कसरत करावी लागत होती. या गावांमधील विद्यार्थी व विद्यार्थिनी  फत्तेपूर व सावळदबारा येथे ये-जा करतात. बस सेवा सुरू झाल्याचा फायदा दररोज शिक्षणासाठी ये-जा करणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांना झाला आहे. या भागात बस सेवा सुरु करण्यात यावी अशी मागणी सरपंच मनिषाताई ज्ञानेश्वर वारंगणे ग्रामपंचायत सदस्य अतुल इंगळे यांनी केली होती. गावांमधून फार मिळकत नसल्याचे कारण देत महामंळाने अनेकदा ही मागणी टोलावली होती.मागच्या महिन्यात सोयगाव येथील आगार प्रमुख विजय काळवणे आगारातील व्यवस्थापकांना पत्र देत सोयगाव,सावळदबारा येणाऱ्या दोन्ही बस वापसी सोयगाव कडे येताना मोलखेडा मार्गे बस सेवा सुरू करण्याचे बजावले. अखेर गुरुवारी सोयगाव आगाराची सोयगाव ते सावळदबारा मार्गे मोलखेडा, दोन टाईम बस सेवा सूरू करण्यात आल्याने ग्रामस्थांचा आनंद आभाळात टेकला आहे.याप्रसंगी सरपंच मनीषाताई ज्ञानेश्वर वारंगणे, सरपंचपती ज्ञानेश्वर वारंगणे, जेष्ठ समाजसेवक रामभाऊ रामचंद्र वारंगणे, स्वानंद पाटील,ग्रामपंचायत सदस्य अतुल इंगळे, नामदेव लोहार, निवृत्ती वरंगणे,निवृत्ती काळे, निखिल पाटील,समाधान शिंगारे, वैभव गायकवाड, संतोष काळे,विशाल अंगाईत, अमोल चौके, संतोष पाटील, अनंता ताठे, गणेश गायकवाड, अमोल कळसकर, मयूर दाणे
आणि शाळेची मुले यांनी आगार प्रमुख विजय काळवणे यांचे आभार मानले.

# प्रेम एकीशी अन् लग्न दुसरीशी

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर:** इंस्टाग्रामवरून मैत्री झालेल्या युवकाने तरुणीला लग्नाचे आमिष दाखवले. तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित करीत बळजबरीने गर्भपात केला. मात्र, गावी जाऊन दुसऱ्याच तरुणीशी लग्न केले. प्रियकराचे लग्न झाल्याची माहिती मिळताच प्रेयसीने बलात्कार झाल्याची तक्रार पोलिसात केली. या प्रकरणी तरुणीच्या तक्रारीवरून एमआयडीसी पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपी युवकास अटक केली. राघवेंद्र ऊर्फ राज राधेश्याम यादव (३१,एमआयडीसी) असे आरोपीचे नाव आहे.
२३ वर्षीय तरुणीची  इंस्टाग्रामवरून राज यादवशी ओळख झाली. तो वाहतूक व्यावसायिक आहे. राजने १ मार्च २०२१ मध्ये तिला वाढदिवस असल्याचे सांगून घरी नेले. तेथे वाढदिवसाचा कोणताही कार्यक्रम नव्हता. राजने तिला शारीरिक संबंधाची मागणी केली. तिने नकार देताच तिच्यावर बलात्कार केला. तिने मैत्री तोडण्याचा निर्णय घेतला. तिने मैत्री तोडण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे राजने तिला लग्न करण्याचे आमिष दाखवले. तिच्या आईवडिलांची भेट घेऊन लग्न लावून देण्याबाबत बोलणे केली. त्यानंतर तो शारीरिक संबंध प्रस्थापित करीत होता.



# बनावट कागदपत्रे देऊन मालमत्ता विकणारा मुख्य आरोपी अमोल मोरे ताब्यात

## स्थानिक गुन्हे शाखेने केला संपूर्ण टोळीचा परदा फाश

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** एका खरेदी विक्रीच्या प्रकरणात मुख्य आरोपी अमोल मोरे व इरफान पटेल यांनी एका महिलेचे बनावट कागदपत्र तयार करून व बनावट महिला उभी करून संपूर्ण टोळीच्या साह्याने परस्पर जमीन विकण्याचा प्रयत्न केला होता ही बाब स्थानिक गुन्हे शाखेच्या लक्षात येताच त्यांनी तात्काळ टोळीचा परदा फाश केला.

श्रीमती जेबुनिशा मोहम्मद शफी वय ७० रावतगड, राजस्थान यांनी देवपूर येथील दोन प्लॉट सन १९८७/८८ मध्ये नोंदणीकृत खरेदी खताव्दारे खरेदी केली होती. व सदर प्लॉट हे त्यांच्याच नावावर देखील दिनांक २८/१०/२०२० ते दिनांक २८/११/२०२२ या दरम्यान अमोल अशोक मोरे व इरफान रऊफ पटेल अशा प्रधान महेलेचे बनावट आधार कार्ड तयार केले. सदर कागदपत्र बनावट



(१) शेख अजोज शेख भिकारी,बिलकिस बी सरफुददीन शेख, (३) रईस शेख शरीफ शेख,(४) रामचंद्र वामन अहिरे रा. ग.न. १४, बरखेडीरोड, जुने धुळे, सुभाष नगर, धुळे (५) सुशील प्रेमचंद जैन धुळे अशाप्रकारे घडत असतांनाही तुम्ही जेबुनिशा मोहम्मद शफीचे नाव घेऊन तोतया महोला उभी करून सहा. दुय्यम निबंधक (वर्ग-२), धुळे-३ येथे दोन्ही प्लॉटची परस्पर खरेदी विक्री केली असल्याने मूळ जेबुनिशा मुलगा मोहम्मद शरीफ मोहम्मद शफी वय-५२, शिक्षण- ITI, व्यवसाय. खाजगी नोकरी, रा. घर न. २७, नवे मार्केट, मारटार मागे, रावतभा, चितोडगढ, राजस्थान, त्यांनी धुळे शहर पोलिस स्टेशनला मानवाने गुन्हा दाखल करण्यात आला आहे.अशा प्रकारे बनावट कागदपत्र तयार करुन त्या आधारे बनावट खरेदी विक्री करणारी मोठी टोळी धुळे शहरात कार्यरत आहे. अशा प्रकारे कोणाची फसवणुक झाली असल्यास अशांनी पो.नि. दत्तात्रय शिंदे, स्थानिक गुन्हे, शाखा धुळे यांचेशी संपर्क साधावा असे पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे सर यांनी आवाहन केले आहे. सदर गुन्हयातील मुख्य आरोपी (१) अमोल अशोक मोरे, (२) इरफान रऊफ पटेल अशांना अटक करण्यात आली असुन सदरची कामगीरी पोलीस अधीक्षक श्री. श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक श्री. किशोर काळे यांचे मार्गदर्शना खाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि, दत्तात्रय शिंदे,प्रकाश पाटील,शाम निकम, संदीप पाटील, रविंद्र माळी, सुरेश भालेराव,रविकिरण राठोड, सुशिल शेंडे,निलेश पोतदार, हर्षल चौधरी, गुणवंतराव पाटील अशांनी केली आहे.

# ढगाळ वातावरणामुळे पिकांची वाढ खुंटली

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यात सद्या ओली धुई ,ढगाळ वातावरण व वातावरणात सतत बदल तथा उन्ह थंडीचा अभावी रब्बी पिकांतील गहु हरभरा तुर मका पिकांची वाढ खुंटली असुण पिके कोकडले असल्याचे चित्र आहे.

ऐन हिवाळ्यात अवकाळी ने अवकाळा लावली आहे.खरिप पिके पाऊस पाण्याअभावी गेली तर रब्बी पिकांची पेरा केलेले उगवणी झालेली पिके अवकाळीने वाट लावून दिली आहे.खुलताबाद तालुक्यातील भौगोलिक क्षेत्र ४८हजार ३६२ हेक्टर असुण १९हजर७३१हेक्टर रब्बी पेरा पेरणीचे क्षेत्र आहे.त्यापैकी ८हजार४०हेक्टर दरम्यान रब्बी पेरा २८नोव्हेंबर दरम्यान म्हणजे ६२% करण्यात आले होते २०%पर्यंत शिल्लक होते असताना दि.२६ ते ३०दरम्यान तालुक्यात अवकाळीने फटका देवून पेरा केलेल्या पिकांना फटका दिला.यात तालुक्यातील बाजार सावंगी सुलतानपूर वेरुळ तीन महसूल मंडळ मधे जोराचा व अति जोराचा मुसळधार पाऊस झाला यात बाजार सावंगी महसूल मंडळ मध्ये१५० मिमी, सुलतानपूर ९९मिमी,वेरुळ ७९मिमी दरम्यान अंदाजे मुसळधार पाऊस झाला.त्यामुसळधार पावसामुळे ठिकठिकाणी तालुक्यात नदी नाले ओढ्यांना पुरपाणी आले.तर तेव्हा पासून गत १५-२०दिवसापासुन ढगाळ वातावरण अधूनमधून ओली धुई हवामानात सतत बदल होत असल्याने रब्बी पिक हंगामातील गहु हरभरा तुर मका पिकांना फटका बसला असून त्यांच्यात वाढ होण्या ऐवजी पिकें कोकडलेले व पिवळे दिसून येत आहे.काही ठिकाणी रब्बी पिकांचा पेरा केलेला गहु हरभरा यांची दुबार पेरा करावा लागत आहे.



# बाबासाहेबांच्या संविधान कार्याचा विशेष गौरव : निरा-शिवतक्रार येथे अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**निरा-शिवतक्रार :** ६७ व्या महापरिनिर्वाण दिनी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना निरा-शिवतक्रार ता.पुरंदर येथील ग्रामपंचायत कार्यालयात अभिवादन करण्यात आले.यावेळी सरंपच तेजश्री काकडे,उपसरपंच राजेश काकडे, सदस्य अनिल चव्हाण, अभिषेक भालेराव, बौद्धाचार्य दादासाहेब गायकवाड, समर्थ संस्थेचे चेअरमन राजेश चव्हाण, रिपब्लिकन पक्षाचे अमोल साबळे, सामाजिक कार्यकर्ते सचिन मोरे, सूनिल पाटोळे, स्वप्नील कांबळे, मिलिंद गायकवाड, संदिप जावळे व इतर उपस्थित होते. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याबद्दल वैचारिक मंथनातून अभिवादन करत असताना त्यांनी केलेल्या संविधान कार्याबद्दल मान्यवरांकडून गौरव करण्यात आला. सरपंच तेजश्री काकडे,उपसरपंच राजेश काकडे, ग्रामपंचायत सदस्य अनिल चव्हाण, सामाजिक कार्यकर्ते सचिन मोरे,लोकशाहीर अण्णाभाऊ साठे प्रतिष्ठानचे सुनिल पाटोळे आम आदमी पक्षाचे महेश जेधे, यांनी भावना व्यक्त केल्या. सरपंच तेजश्री काकडे म्हणाल्या की,जनतेला ज्यांनी संविधाना मार्फत न्याय देण्याचं काम केलं.ज्यांनी संविधान लिहिलं ते भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर होत.त्यांना महापरिनिर्वाण दिनी भावपूर्ण आदरांजली वाहते.सर्वांनी जे संविधान लिहिलेलं आहे त्या कायद्याच्या चौकटी दिलेल्या आहेत,त्या कायद्याच्या चौकटीत राहून त्यानुसार वागावं.आजच्या दिनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य आठवणीत आणले पाहिजे.उपसरपंच राजेश काकडे म्हणाले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे दादर, चैत्यभूमीला अंत्यसंस्कार करण्यात आले.खरंतर आपण अनेक महापुरुषांना अमर रहे असे म्हणतो.परंतु खऱ्या अर्थाने कुठला जर महापुरुष समाजा मध्ये अमर असेल तर ते भीमरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर होत. कारण संविधानाच्या माध्यमातून सजीव सृष्टी मध्ये जे काही सजीव आहेत.त्यांची प्रत्येक हालचाल,आयुष्यातील घटना ही संविधानाशी जोडलेली असते. त्यामुळे संविधानाच्या माध्यमातून डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे सतत अमर आहेत.त्यांचे स्मरण करून त्यांनी दिलेल्या संविधानाच्या चौकटी मध्ये राहण्याचं जे बंधन आहे.त्यामध्ये राहण्याची आठवण सर्वांना करून देतो. ग्रामपंचायत सदस्य अनिल चव्हाण म्हणाले की,डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार समाजा पर्यंत पोहचविणे,जतन करणे हीच खरी आदरांजली ठरू शकते.सामाजिक कार्यकर्ते सचिन मोरे यांनी म्हटले की,समाजातील होत असलेल्या अन्याय अत्याचाराचा सखोल अभ्यास करून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व समाज घटकांना न्याय मिळण्याकरिता लोकशाहीतलं खऱ्या अर्थाने एक संविधान लिहिण्यात आलं.त्या संविधाना मध्ये प्रज्ञा, शील आणि करुणा ही गौतम बुध्दांची विचारधारेचा आधार घेऊन सर्वाना समता न्याय हक्क मिळवून दिले. हा विचार आपल्यात बिंबविता आला पाहिजे. महेश जेधे म्हणाले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान लिहून सर्वांना न्याय मिळवुन दिला आहे.या तत्त्वावर सर्वांनी चालले पाहिजे.सुनील पाटोळे यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे प्रतिष्ठानच्या वतीने अभिवादन केले.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 67 व्या महापरिनिर्वाण दिनी अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**संकेत बाबा बागरेचा**

**धुळे :** आजाद समाज पार्टी धुळे जिल्हा तसेच भीम आर्मी धुळे जिल्हा पदाधिकारी तर्फे आज दि.6/12/2023 रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 67 व्या महापरिनिर्वाण दिनी_ अभिवादन करण्यात आले. तसेच ब्लड फॉर बाबासाहेब या संकल्पनेनुसार करुणा सोशल ब्लड ग्रुपतर्फे रक्तदान शिबीर घेण्यात आले यावेळी धुळे तालुका अध्यक्ष सुदाम भामरे यांनी रक्तदान केले. यावेळी आजाद समाज पार्टीचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष इंजी.प्रशांत वाघ, भीम आर्मीचे जिल्हाध्यक्ष संजय चव्हाण, जिल्हा कोषाध्यक्ष झणके, उत्तर महाराष्ट्र संघटक राजाभाऊ उमाळे, आजाद समाज पार्टीचे उत्तर महाराष्ट्र संघटक पापाभाई अन्सारी, जिल्हा संघटक रवी कढरे, शहर अध्यक्ष अजहर शेख, शहर संघटक समाधान चंदनशिव, शहर कार्याध्यक्ष शोएब शेख, धुळे तालुका अध्यक्ष सुदाम भामरे, धुळे तालुका उपाध्यक्ष राहुल पाटील, धुळे तालुका सचिव सुधीर फुलपगारे, बंटी कढरे, धुळे तालुका संघटक विनोद शिरसाठ, वाहतूक आघाडी शहर अध्यक्ष सुलतानभाई सय्यद इत्यादी उपस्थित होते.



# शेतकऱ्यांचे पिकं कर्ज त्वरित माफ करा; शरद जोशी शेतकरी संघटनेची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यात सततचा दुष्काळामुळे व अवकाळीने शेतकऱ्यांची खरीप हंगामातील संपुर्ण पीके वाया गेली आहे तसेच रब्बी हंगामही पूर्णपणे संकटात आहे. शेतकऱ्यांनी पिक कर्ज व हातउसणवार घेऊन लागवड केली होती; परंतू दुष्काळामुळं अवकाळीने शेतकऱ्यांचे संपूर्ण पीक वाया गेले असल्यानं शेतकऱ्यांच्या डोक्यावर कर्जाचा डोंगर वाढत चालला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी घेतलेले पिक कर्ज माफ करणे अत्यंत गरजेचे झाले आहे. शेतकऱ्यांनी पिके कर्ज घेवून उभी केलेली पिके पूर्णतः नष्ट झाल्याने शेतकऱ्याचे कष्ट वाया गेले आहे. सतत दुष्काळ व अवकाळी संकटाचा सामना करत आहे; परंतू सततच्या या परिस्थितीमुळे शेतकरी मेटाकुटीला आलेला आहे. गोरगरीब शेतकरी आणि शेतमजुरांपुढे उपजीविकेचा मोठा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे तसेच जनावरांच्या चारा, पाण्याचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे. या सर्व परिस्थितीपुढे शेतकरी पुरता हतबल झाला आहे. यामुळे दिवसेंदिवस शेतकरी, शेतमजूर यांच्या आत्महत्येचे प्रमाण वाढत आहे. अशा परिस्थितीत कर्जमाफी, वीजबिल माफी बरोबरच शेतकरी, शेतमजुरांना उपजीविकेसाठी सरकारन काहीतरी मार्ग काढून शेतकऱ्यांना दिलासा देणे क्रमप्राप्त झाले आहे. सर्व बाबींचा गांभिर्याने अभ्यास करून दुष्काळग्रस्त भागातील कुटुंबांना उपजीविकेसाठी राज्य सरकारनं योग्य निर्णय घेवून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज माफ करावे अशी मागणी जिल्हा अध्यक्ष काशिनाथ जाधव शरद जोशी युवा मंच शेतकरी संघटना महाराष्ट्र राज्य यांनी केली आहे.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम
परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
• जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी) • त्वचा व गुप्त रोग • वजन वाढविणे
• आम वात उदर रोग • स्त्रीयांचे आजार • वजन कमी करणे
• दमा व ॲलर्जी (जुनाट) • स्थूलपणा, मूळव्याध • केसांच्या सर्व तक्रारी
• चिकन गुनिया • वंध्यत्व, संतती प्राप्ती • लहान मुलांची
• मनोकयीईक आजार • कॅन्सर सल्ला, मुतखडा • स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# छत्रपती संभाजीनगर, थेम्स फ्रीपोर्ट, यूके यांच्यादरम्यान व्यावसायिक, उद्योग क्षेत्र यामध्ये देवाणघेवाण होण्याच्या दृष्टीने शिष्टमंडळाचा दौरा

## चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर, थेम्स फ्रीपोर्टचे यांच्यामध्ये सामंजस्य करार

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :**यूंनाइटेड किंगडम येथील थेम्स फ्रीपोर्टच्या एका उच्चस्तरीय शिष्टमंडळाने भारत – युके व्यापार वृद्धिंगत करणे तसेच छत्रपती संभाजीनगर आणि विभागाला लॉजिस्टिक हब विकसित करण्याच्या हेतूने छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे भेट दिली. या दौऱ्यात थेम्स फ्रीपोर्टच्या प्रमुख प्रतिनिधींचा समावेश असलेले शिष्टमंडळाने शेंद्रा (AURIC), छत्रपती संभाजीनगर येथील विविध कंपन्यांमध्ये भेट देऊन छत्रपती संभाजीनगर आणि थेम्स फ्रीपोर्ट यांच्यादर्म्यांन व्यावसायिक, उद्योग क्षेत्र यामध्ये देवाणघेवाण होण्याच्या दृष्टीने काय पाऊले ऊयचाळता येईल याबद्दल चर्चा केली.

या भेटीमध्ये चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर येथे उद्योजक संस्थांशी चर्चा करण्यात आली तसेच याप्रसंगी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधतांना थेम्स फ्रीपोर्टचे सीईओ श्री. मार्टिन व्हाईटली म्हणाले की थेम्स फ्रीपोर्टच्या माध्यमातून आम्ही युके मध्ये भारतातून अधिकाधिक गुंतवणूक, निर्यात आणण्यासाठी प्रयत्नशील असून, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) आणि थेम्स फ्रिपोर्ट यांच्यामध्ये एकत्र येऊन व्यवसाय करण्याच्या मन्युफचरिंग, औटोमोबाईल, लॉजीस्टिक्स, अन्नप्रक्रिया यासारख्या क्षेत्रात मोठ्या संधी आहेत. पुढे बोलतांना ते म्हणाले की भारत ज्या गतीने प्रगति करत आहे त्या मध्ये औरंगाबाद सारख्या छोट्या आकाराचा पण मोठी औद्यिगिक क्षमता असलेल्या शहरांचा मोठा वाटा आहे. औरिकने सात वर्षांच्या अल्प कालावधीत साध्य केलेल्या उल्लेखनीय प्रगतीबद्दल ते अत्यंत प्रभावित झाले.

क्रिस्टोफर रॉबर्ट ग्रीन - संचालक - कमर्शियल, यूके पोर्ट आणि टर्मिनल यांनी भरातून युके मध्ये होणाऱ्या निर्यातीसंदर्भात बोलतांना माहिती दिली की लवकरच दोन्ही देशातील सरकार फ्रीट्रेड कराराला मंजूरी देणार आहे. आजघडीला युके मध्ये निर्यातीमध्ये भारताचा दूसरा क्रमांक आहे, फ्रीट्रेड करमुळे यामध्ये नजीकच्या भविसयात मोठी वाढ होईल.

एकत्र काम करण्याच्या दृष्टीने तसेच स्टार्टअप्स, तंत्रज्ञान आणि नाविन्यतेला जोर देण्याच्या दृष्टीने भेटीमध्ये चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर आणि थेम्स फ्रीपोर्टचे यांच्यामध्ये लवकरच सामंजस्य करार होणार असल्याची माहिती सीएमआयएचे अध्यक्ष दुष्यंत पाटील यांनी दिली. या सामंजस्य कराराच्या माध्यमातून पुरवठा साखळी आणि शाश्वततेसाठी एकत्र काम करण्यासंदर्भात एकवाक्यता झाली असल्याची माहिती त्यांनी दिली. तसेच यामध्यमातून आपल्या विभागात मोठी गुंतवणूक तसेच येथील उद्योगांना युके मध्ये निर्यात संधी याबद्दल भागीदारीकरिता चर्चा झाली.



थेम्स फ्रीपोर्टचे गुंतवणुकीच्या प्रमुख लुसियाना सिउबोटारिउ म्हणाल्या की, व्यवसाय करण्याच्या दृष्टीने आमच्या येथे अनेक सोयी सुविधा तसेच प्रोत्साहन दिले जात आहे. आम्ही नाविन्यता आणि स्टार्टअप यांच्या मदतीने उद्योग हब करण्याच्या दृष्टीने सकारात्मक असल्याचे त्या म्हणाल्या. या भेतीदारम्यान त्यांनी मॅजिक इंक्युबेशन सेंटरळा भेट दिली तसेच विभागातील स्टार्टअप्सन त्यांचा व्यवसायाचे आंतर्राष्ट्रीयकारण तसेच तंत्रज्ञान देवांहेवन याबाबत सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

ख्रिस्तोफर रॉबर्ट ग्रीन - संचालक - कमर्शियल, यूके पोर्ट आणि टर्मिनल, डीपी वर्ल्ड म्हणाले की औरिक, ड्रायफोर्ट आणि थेम्स फ्रीपोर्ट यामध्ये अनेक साधर्म्य असून तंत्रज्ञानाच्या सहाय्याने विकसित या शहराचा देशाच्या विकासात मोठा वाटा आहे, नजीकच्या भविध्यत या प्रगतीचा एक भाग होण्याची आमची ईछा असल्याचे त्यांनी सांगितले.

या शिष्टमंडळात मार्टिन व्हाईटली – सीईओ, थेम्स फ्रीपोर्ट, लुसियाना झिम्बार्डी सिउबोटारिउ – ट्रेड आणि इन्व्हेस्टमेंट प्रमुख, थेम्स फ्रीपोर्ट, क्रिस्टोफर रॉबर्ट ग्रीन - संचालक - कमर्शियल, यूके पोर्ट आणि टर्मिनल, डीपी वर्ल्ड, श्री दलजित सिंग ओबेरॉय - उत्पादन विकास व्यवस्थापक - ओशन फॉरवर्डिंग, डीपी वर्ल्ड, श्री जोनाथन उर्सेल - संचालक – युके-इंडियाबिझनेस कौन्सिल, श्री रवींद्र जे. गांधी – संचालक, आरजेजी ग्लोबल लॉजिस्टिक सोल्युशन्स प्रा. लि. यांचा समावेश होता. दिवसभरत शिष्टमंडळाने औरिक, शेंद्रा, वाळूज, रेल्वेस्टेशन औद्योगिक वसाहत येथील उद्योगांना भेट दिली.

# ज्ञानकुंज महाविद्यालयामध्ये महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथे ज्ञानकुंज कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय बाजार सावंगी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त ज्ञानाच्या अथांग सागरास विनम्र अभिवादन करण्यात आले यावेळेस महाविद्यालयाची विद्यार्थिनी वैष्णवी गोरे व आकांक्षा पडसवान यांनी सूत्रसंचालन केले व वैष्णवी डापके आणि ऋतुजा बनकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना गायनाच्या माध्यमातून वंदन केले तर इतर विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी मनोगत व्यक्त केले याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य योगेश झिंजुर्के प्रा. मनोज राणे, श्रीमती योगिता पारनेरे नितीन पवार, राम राठोड श्रीमती वृषाली कुलकर्णी, कृष्णा चव्हाण,अविनाश गाडेकर, योगेश सुरडकर, श्रीमती सुरेखा जाधव, दीपक पाटील,राहुल गायकवाड, भूषण जाधव,अविनाश कोलते, अक्षय जाधव, श्रीमती नलावडे,पाचवने मॅडम, खान मॅडम, चोपडे मॅडम, आजिनाथ जाधव, धुमाळ बाबा यांची उपस्थिती होती.



# आजारपणाला कंटाळून पत्नीचा केला खून

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर:** तीन महिन्यांपासून आजारी असलेल्या पत्नीचा पत्नी गळा दाबून खून करून स्वतः गळफास घेऊन आत्महत्या केली. ही दुर्दैवी घटना मौदा तालुक्यातील माथनी गावात घडली. विमला गजभीये असे खून झालेल्या महिलेचे तर प्रभाकर रामाजी गजभीये असे आरोपीचे नाव आहे. प्रभाकर गजभीये हे मूळचे भंडारा जिल्ह्यातील बेला गावचे असून असून कामाच्या शोधात ते मौदा तालुक्यात आले होते. माथनी गावात मुलगा विजयसह राहत होते. गेल्या तीन महिन्यांपासून पत्नी विमला हा आजारी होत्या. त्यांच्यावर उपचार सुरु होते. परंतु, त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होत नव्हती. पत्नीसाठी जेवन बनविण्यापासून ते सर्वच काम प्रभाकर यांना करावे लागत होते. प्रभाकर यांनाही दम्याचा आजार होता. पत्नी व स्वतःच्या आजाराला ते कंटाळले होते. त्यांनी सोमवारी रात्री गळा दाबून खून केला तर स्वतः गळफास घेऊन आत्महत्या केली. 'मी माझ्या पत्नीचा खून करून आत्महत्या करीत आहेत. मी आजाराला कंटाळलो होतो. त्यामुळे आमच्या मृत्यूस कुणालाही जबाबदार धरू नये.' अशी चिठ्ठी लिहून ठेवली होती. ती चिठ्ठी मुलगा विजय यांना मिळाली.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर